सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण विभाग**

# प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम

**Diploma in Elementary Education**

**(D.El.Ed.)**

## प्रथम वर्ष प्रवेश २०२२-२३

## ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया

### नियमावली / Rules

संकेत स्थळ : **www.maa.ac.in**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३०.

# प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम (D.El.Ed.) प्रवेश नियमावली २०२२-२३

**सर्वसाधारण :**

या प्रवेश नियमावलीमधील नियम महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित सर्व माध्यमाच्या अध्यापक विद्यालयांना (अल्पसंख्याकांसह) तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना लागू राहतील.

**ही नियमावली तयार केल्यानंतर आलेले शासन निर्णय व न्यायालयीन निर्णयानुसार सदर नियमावलीमध्ये आवश्यक तेथे बदल होऊ शकतात. हे बदल सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील.**

**१) व्याख्या**

**१.१** **'एन. सी. टी. ई.' (NCTE)** म्हणजे 'एन. सी. टी. ई.' अधिनियम १९९३ च्या अनुषंगाने स्थापन झालेली राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद व त्यांची विभागीय कार्यालये.

**१.२** **'शासन'** म्हणजे महाराष्ट्र शासन, **'विभाग'** म्हणजे महाराष्ट्र शासनाचा प्रशासकीय विभाग (शालेय शिक्षण विभाग, मुंबई)

**१.३** **'संचालक'** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे म्हणजे शालेय शिक्षण विभागांतर्गत असलेल्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे संस्थेचे संचालक.

**१.४** **'महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद'** म्हणजे शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत विविध शासकीय परीक्षा (प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षेसह) आयोजित करणारी व प्रमाणपत्रे प्रदान करणारी स्वायत्त संस्था.

**१.५** **'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (D.I.E.T.)** म्हणजे केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा वाढविण्याकरिता व प्राथमिक शिक्षकांना भरीव प्रशिक्षण देणारी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन केलेली संस्था.

**१.६** **'मान्यताप्राप्त अध्यापक विद्यालय'** म्हणजे महाराष्ट्र राज्यात एन. सी. टी. ई. ची मान्यता असलेले संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी परवानगी दिलेले व राज्य शासनाने विहित केलेल्या प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण देणारे शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय.

**१.७** **'अनुदानित संस्था'** म्हणजे शासनाने विहित केलेल्या अनुदानसूत्रानुसार शासनाकडून अनुदान मिळत असलेली संस्था.

**१.८** 'विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय' म्हणजे मान्यताप्राप्त संस्थेच्या ज्या अध्यापक विद्यालयास शासनाकडून वेतन व वेतनेतर बाबींसाठी कोणतेही अनुदान मिळत नाही असे अध्यापक विद्यालय.

**१.९** **'मान्यताप्राप्त संस्था'** म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार नोंदणी केलेली संस्था व 'एनसीटीई' ची मान्यता आहे अशी प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम कार्यान्वित करणारी संस्था.

**१.१०** **'अल्पसंख्याक संस्था'** महाराष्ट्र शासनाने धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून घोषित केलेली संस्था.

**१.११** **'प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम' (D.El.Ed.)** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) किंवा सी. बी. एस. ई./ आय. सी. एस. ई./ राष्ट्रीय मुक्त विद्यालये/ इतर राज्य मंडळ यांची इयत्ता १२ वी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तसेच मुंबई हिंदी विद्यापीठाची ''भाषारत्न'' परीक्षा /यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने मान्य केलेला प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर प्राप्त होणारी पदविका.

**१.१२** **'सेवापूर्व प्रशिक्षण'** म्हणजे महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षक' या पदासाठी आवश्यक व विहित केलेली व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्यासाठी विहित केलेले प्रशिक्षण.

**१.१३** **'डोंगरी क्षेत्र'** म्हणजे शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक–टीसीएम १८९७ (२३/९७) माशि–४ दिनांक १ जुलै, १९९७ अन्वये घोषित केलेले क्षेत्र. तसेच शासनाने शासन आदेशान्वये वेळोवेळी घोषित केलेले डोंगरी क्षेत्र.

**१.१४** **'उमेदवार'** म्हणजे नियम क्रमांक ६ नुसार शैक्षणिक पात्रता धारण करणारी व्यक्ती.

**२) नियमांची व्याप्ती**

महाराष्ट्र राज्यातील एन.सी.टी.ई. ने मान्यता दिलेल्या व संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी संलग्नता दिलेल्या सर्व अध्यापक विद्यालयांना हे प्रवेश नियम लागू होतील.

**३) प्रवेश कोटा**

**३.१ अध्यापक विद्यालयास प्रथम वर्षाच्या मंजूर प्रवेश क्षमतेनुसार शासन कोटा व व्यवस्थापन कोटा खालीलप्रमाणे राहील.**

| क्र. | अध्यापक विद्यालयाचा प्रकार | शासन कोटा मंजूर क्षमतेच्या | व्यवस्थापन कोटा मंजूर क्षमतेच्या |
|---|---|---|---|
| १) | शासकीय व खाजगी अनुदानित अध्यापक विद्यालय | १००% | –––– |
| २) | खाजगी विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय | ८०% | २०% |
| ३) | खाजगी अनुदानित अल्पसंख्याक अध्यापक विद्यालय | ५०% | ५०% |
| ४) | खाजगी विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक अध्यापक विद्यालय | –––– | १००% |

**३.२ ज्या अध्यापक विद्यालयाच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने विशिष्ट आदेश दिले असतील तर ते लागू राहतील.**

**३.३** शासन कोट्यातील प्रथम वर्षाच्या एकूण प्रवेश क्षमतेपैकी ७०% जागा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय शिक्षण मंडळनिहाय विभाग स्तराच्या गुणवत्तेनुसार व ३०% जागा राज्यस्तराच्या गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**४) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणेबाबत**

**४.१** उमेदवाराने ऑनलाईन प्रवेश अर्ज राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर जाऊन भरावा. प्रवेश अर्ज भरण्याबाबतच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**४.२** प्रवेश अर्जाची किंमत

रु. २००/–(खुल्या संवर्गासाठी)

रु. १००/– (खुला संवर्ग वगळून अन्य संवर्गासाठी)

**४.३** महाराष्ट्राबाहेरील इतर राज्य मंडळातून इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी ते महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्याचे रहिवासी आहेत (विना अनुदानित अल्पसंख्याक संस्था वगळून) त्या जिल्ह्याचा संकेतांक क्रमांक इ. १२ वी परीक्षा उत्तीर्ण जिल्हा या ठिकाणी लिहावा.

**४.४ प्रवेशाचे वेळापत्रक :**

प्रवेशाबाबतचे संभाव्य वेळापत्रक परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

उमेदवाराने प्रवेशपत्र मिळाल्यानंतर ४ दिवसात संबंधित अध्यापक विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा.

४.५ प्रवेश अर्ज स्वीकारल्यानंतर राज्यस्तरीय व विभागस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समितीकडून उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. प्रवेशासाठी अर्ज भरलेल्या सर्व उमेदवारांची प्रवेश अर्जावरील माहितीची पडताळणी यादी **(चेकलिस्ट कम् मेरिटलिस्ट)** वेबसाईटवर पाहण्यास उपलब्ध केली जाईल. **चेकलिस्ट कम मेरिटलिस्ट पाहणे ही उमेदवाराची जबाबदारी आहे.** उमेदवार प्रवेशासाठी ज्या वैधानिक अथवा सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छित असेल त्या बाबतच्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रती अर्ज दाखल करतानाच अर्जासोबत जोडाव्यात. एकदा अर्ज सादर केल्यानंतर **नव्याने कोणतेही प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.**

**५) प्रवेश देण्यास सक्षम प्राधिकारी**

डी.एल.एड. प्रवेशाबाबत नियंत्रण, पर्यवेक्षण व देखरेख करण्याचे अधिकार व जबाबदारी अध्यक्ष, डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समिती तथा संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची राहील. प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रमास मान्यताप्राप्त अध्यापक विद्यालयात प्रवेश देण्याची सर्व प्रक्रिया राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समितीमार्फत पूर्ण केली जाईल **व विभागीय पातळीवर विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत पूर्ण केली जाईल.**

राज्यस्तरीय प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

**५.१ राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समिती**

**१)** संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ........................... अध्यक्ष

**२)** सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ........................ उपाध्यक्ष

**३)** आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे ........................................................ सदस्य

**४)** विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) .................................................................. सदस्य

**५)** प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (२) ....................................................... सदस्य

**६)** शिक्षणाधिकारी (माध्यमिक–१) ........................................................................ सदस्य

**७)** प्राचार्य, अध्यापक विद्यालय (३) ...................................................................... सदस्य

**८)** उपसचिव, राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ ............................................................. सदस्य

**९)** उपसंचालक सेवापूर्व शिक्षण, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे. ............................................................................................ सदस्य सचिव

क्रमांक ५ ते ७ सदस्यांचे नामनिर्देशन संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ३० यांच्याकडून केले जाईल.

**५.२ विभागस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती**

**१)** विभागीय शिक्षण उपसंचालक ........................................................................ अध्यक्ष

**२)** प्राचार्य, जि. शि. प्र. संस्था (संबंधित विभाग मुख्यालय)................................................ निमंत्रक

**३)** प्राचार्य, उर्वरित सर्व जि. शि. प्र. संस्था ................................................................ सदस्य

**४)** शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (१) ......................................................................... सदस्य

**५)** प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय (१) .......................................................... सदस्य

**६)** प्राचार्य, अनुदानित अध्यापक विद्यालय (१) ....................................................... सदस्य

**७)** प्राचार्य, विनाअनुदानित अध्यापक विद्यालय (१) .................................................. सदस्य

(क्र. ४ ते ७ सदस्यांचे नामनिर्देशन विभागीय शिक्षण उपसंचालक करतील.)

**५.३ प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समितीची कर्तव्ये व अधिकार**

**१)** वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणे.

**२)** ऑनलाईन भरलेल्या अर्जांची छाननी करणे, गुणानुक्रमानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करणे.

**३)** शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार राज्यस्तरीय/विभागस्तरीय गुणवत्तेनुसार, माध्यमनिहाय, शाखानिहाय व संवर्गनिहाय आरक्षणानुसार उमेदवारांना अध्यापक विद्यालयातील उपलब्ध जागांची माहिती देऊन त्यांनी ऑनलाईन केलेल्या निवडीच्या प्राधान्यक्रमानुसार विहित केलेल्या कार्यपद्धतीने प्रवेश देणे.

**५.४ प्रथम वर्ष पुनर्प्रवेश** :

प्रथम वर्षातील जे विद्यार्थी/विद्यार्थिनी सबळ कारणास्तव (उदा. गंभीर आजार, नैसर्गिक आपत्ती, स्त्रियांच्या बाबतीत प्रसूती इत्यादी) किमान उपस्थिती अभावी परीक्षेस अपात्र ठरतील. त्यांचा एक वर्षापेक्षा कमी कालावधी खंड क्षमापित करून त्यास पुढील वर्षी प्रथम वर्षात त्याच अध्यापक विद्यालयात पुनर्प्रवेश देण्याचे अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना राहतील. उमेदवारांनी पुनर्प्रवेशासाठी संबंधित अध्यापक विद्यालयामार्फत सक्षम आधिकाऱ्याकडे त्वरित अर्ज करावा. सक्षम अधिकाऱ्यांनी पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी निर्णय द्यावेत. वैद्यकीय कारणास्तव खंड असल्यास अर्जासोबत जिल्हा शल्य चिकित्सक/अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. **प्रथम वर्षात पुनर्प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचा खंड क्षमापित करून वरील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रथम वर्षाच्या पुनर्प्रवेशास मान्यता दिल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाचे संपूर्ण शुल्क पुनःश्च भरावे लागेल. परंतु अशा विद्यार्थ्यांना प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या दिनांकापासून पुढील ३ वर्षात पदविका पूर्ण करणे अनिवार्य राहील.**

**६) शैक्षणिक पात्रता**

**६.१** प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम प्रवेशास इच्छुक असणाऱ्या उमेदवारास महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) खुल्या संवर्गातील उमेदवार किमान ४९.५% गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे आणि खुला वगळून अन्य संवर्गातील उमेदवार किमान ४४.५% गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**६.२** महाराष्ट्राचा रहिवासी असलेला सी.बी.एस.ई. किंवा आय.सी.एस.ई. किंवा नॅशनल ओपन स्कूल बोर्डाची व महाराष्ट्राबाहेरील इतर राज्य मंडळाची इ.१२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेला उमेदवार (खुला ४९.५% व अन्य संवर्गातील ४४.५% गुणांसह) प्रवेशास पात्र असेल. मात्र अशा उमेदवाराने महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असल्याचे संबंधित तहसीलदाराचे प्रमाणपत्र (विनाअनुदानित अल्पसंख्याक संस्था वगळून) सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराच्या गुणपत्रिकेतील विषयानुसार त्यांची शाखा (कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी.) ठरविण्यात येईल. सी.बी.एस.ई. किंवा आय.सी.एस.ई. किंवा नॅशनल ओपन स्कूल/ इतर राज्य मंडळांच्या परीक्षेतून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणवत्ता ठरविताना महाराष्ट्रातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत असलेले एकूण (६५०) गुण लक्षात घेऊन त्या प्रमाणात सी.बी.एस.ई. किंवा आय.सी.एस.ई. किंवा नॅशनल ओपन स्कूल/इतर राज्य मंडळांची टक्केवारी ठरविण्यात येईल.

मात्र उत्तीर्ण झालेल्या विषयांपैकी एक विषय इंग्रजी भाषा असावा. त्याचप्रमाणे मुंबई हिंदी विद्यापीठाची भाषारत्न परीक्षा/यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची प्रथम वर्ष यांची टक्केवारी ठरविण्यात येईल.

६.३ उमेदवार उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेत प्रथमतः उत्तीर्ण झाल्यानंतर जे गुण प्राप्त झाले आहेत तेच गुण ग्राह्य धरण्यात येतील. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तुरळक विषय घेऊन (आयसोलेटेड सब्जेक्ट) विषयाची परीक्षा दिलेली असल्यास असे गुण विचारात घेतले जाणार नाहीत.

इयत्ता १२ वी अनुत्तीर्ण विद्यार्थी गुण पडताळणीनंतर उत्तीर्ण घोषित झाल्यास असा विद्यार्थी निकालापासून १५ दिवसांचे आत प्रवेशासाठी अर्ज केल्यास गुणवत्तेनुसार प्रवेशास पात्र राहील. गुण पडताळणीनंतर गुणांत वाढ झाल्यास वाढीव गुणांच्या आधारावर गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांचा प्रवेशास विचार केला जाईल.

६.४ शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि.१० जून २०११ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. टीसीएम २००९/(३६/०९) / माशि ४ अन्वये +२ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमातील (MCVC) खालील विषय घेऊन इ.१२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत. (१) कृषी गटातील हॉर्टिकल्चर व क्रॉप सायन्स (२) आरोग्य व वैद्यकीय सेवा गटातील क्रेंच अॅन्ड प्रिस्कूल मॅनेजमेंट.

६.५ **इ. १२ वी व १० वी समकक्ष बाबत –**

सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र. आर.जी.डी.– १५११/प्र.क्र. ८९/१३ दि. २० मे २०११ नुसार महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे **प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला** वा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.

६.६ **विद्यापीठे, मानीव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदव्या/पदविका समकक्षतेबाबत–** उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र. समक २००७/(२६/०७) मशि–६ दिनांक २८ फेब्रुवारी २००७ नुसार **'मुंबई हिंदी – विद्यापीठ मुंबईची' 'भाषारत्न'** परीक्षा इ. १२ वी समकक्ष असल्याने ही परीक्षा उत्तीर्ण असलेला उमेदवार.

६.७ **वैकल्पिक गटात एकाच विषयाचे जास्तीत जास्त २०० गुण असलेला विषय घेऊन उत्तीर्ण झालेले उमेदवार पात्र समजण्यात येतील.**

६.८ श्रेणी सुधार योजनेमुळे (Class improvement) गुणांत वाढ झाल्यास चालू वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेत सदरचे गुण विचारात घेतले जातील.

७) **अधिक गुणांची सवलत**

७.१ खेळ–राष्ट्रीय पातळीवर/ राज्य पातळीवर .................................................. ३ गुण

**(ज्या विद्यार्थ्यांना एच. एस. सी. बोर्डाकडून खेळाचे अतिरिक्त २५ गुण दिले आहेत अशा विद्यार्थ्यांना या तीन गुणांची सवलत मिळणार नाही.)**

क्रीडा व युवक कल्याण संचालनालय महाराष्ट्र शासन यांनी प्रदान केलेले **जिल्हा क्रीडा अधिकारी यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र आवश्यक.**

७.२ चित्रकला–महाराष्ट्र शासनाची कला संचालनालयाची
इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण .............................................................................. ३ गुण
**चित्रकला प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली निकालपत्राची सत्यप्रत.**

७.३ संगीत–गंधर्व महाविद्यालयाची पदवी/संगीत अलंकार/
संगीत विशारद परीक्षा उत्तीर्ण ........................................................................... ३ गुण
वरील प्रमाणपत्राचे गुण एकूण गुणात मिळविले जातील.

**८) माध्यमनिहाय प्रवेश पात्रता**

८.१ एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक माध्यमांसाठी पात्र असू शकतो. त्याकरिता प्रत्येक माध्यमासाठी स्वतंत्र विकल्पाची नोंद ऑनलाईन करावी. त्यानुसार प्रवेश अर्ज शुल्क आकारणी केली जाईल.

८.२ **मराठी माध्यम** :

अ) जे विद्यार्थी इ. १० वी अथवा इ. १२ वी ची परीक्षा मराठी माध्यमातून उत्तीर्ण झालेले असतील ते उमेदवार मराठी माध्यमासाठी पात्र आहेत.

ब) महाराष्ट्र बोर्ड/सी. बी. एस. ई./आय. सी. एस. ई. बोर्डाची/नॅशनल ओपन स्कूल बोर्डाची/इतर राज्य मंडळाची इ. १० वी अथवा इ. १२ वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेले तसेच मुंबई हिंदी विद्यापीठाची भाषारत्न परीक्षा/ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार की ज्यांनी एक १०० गुणांचा 'मराठी भाषा' विषय इ. १० वी किंवा इ. १२ वी परीक्षेला घेतलेला असावा असे उमेदवार मराठी माध्यमासाठी पात्र आहेत.

८.३ **हिंदी माध्यम :**

अ) हिंदी माध्यमाच्या अध्यापक विद्यालयात प्रवेशासाठी इ. १० वी अथवा इ. १२ वी हिंदी माध्यमातून उत्तीर्ण झालेले उमेदवार पात्र आहेत.

ब) वरील उमेदवारांना प्रवेश देऊनही जागा रिक्त राहिल्यावर अन्य माध्यमांतून इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा गुणवत्तेनुसार विचार होईल. मात्र, अशा उमेदवारांनी इ. १० वी अथवा इ. १२ वी साठी हिंदी १०० गुणांचा भाषा विषय घेतलेला असावा. तसेच त्यांनी **हिंदी माध्यमासाठी स्वतंत्र ऑनलाईन विकल्प नोंदविलेला असावा.**

८.४ **इंग्रजी माध्यम :**

अ) इंग्रजी माध्यमाच्या अध्यापक विद्यालयात प्रवेशासाठी इ. १० वी अथवा इ. १२ वी परीक्षा इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण झालेले उमेदवार पात्र आहेत.

ब) वरील उमेदवारांना प्रवेश देऊनही जागा रिक्त राहिल्यास अन्य माध्यमांतून इ. १२ वी उत्तीर्ण उमेदवारांचा गुणवत्तेनुसार विचार होईल. मात्र अशा उमेदवारांनी इ. १० वी व इ. १२ वी साठी इंग्रजी १०० गुणांचा विषय घेतलेला असावा. तसेच त्यांनी **इंग्रजी माध्यमासाठी स्वतंत्र ऑनलाईन विकल्प नोंदविलेला असावा.**

८.५ **अन्य माध्यम (उर्दू/गुजराती) :**

उमेदवार इ. १० वी किंवा इ. १२ वी संबंधित माध्यमातून उत्तीर्ण झालेला असावा.

**कन्नड माध्यम** :

राज्यातील कन्नड माध्यमाची सर्वच अध्यापक विद्यालये अल्पसंख्याक व्यवस्थापनाची असल्याने कन्नड माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अध्यापक विद्यालयाशी संपर्क साधावा.

८.६ शासन आदेशानुसार दादरा, नगर, हवेली, सिल्वासा या केंद्रशासित प्रदेशांतील उमेदवारांना मराठी, गुजराती व इंग्रजी माध्यमांसाठी अध्यापक विद्यालयात प्रवेश देण्यात येईल, त्यासाठी या केंद्रशासित प्रदेशातील इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावेत.

**९) आरक्षण**

**९.१ शाखानिहाय आरक्षण –** प्रवेशासाठी शाखानिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

१) कला शाखा – ४०% २) विज्ञान शाखा – ५० %

३) वाणिज्य शाखा – ९ % ४) एमसीव्हीसी – १%

**९.२ वैधानिक आरक्षण :** मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) अनुसूचित जाती.........(S. C.) ------------------- १३%

२) अनुसूचित जमाती.......(S. T.) ------------------- ७%

३) विमुक्त जाती–अ........(V. J. -A)------------------ ३%

४) भटक्या जमाती –ब.....(N.T. -B) ----------------- २.५%

५) भटक्या जमाती – क...(N. T. -C)----------------- ३.५%

६) भटक्या जमाती –ड.....(N. T. -D) ----------------- २%

७) विशेष मागास प्रवर्ग......(S. B. C.)------------------ २%

८) इतर मागास प्रवर्ग.......(O. B. C.)----------------- १७%

९) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ...... (E. W. S.)-- १०% (अल्पसंख्याक संस्था वगळून)

राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षित जागा भरतेवेळी शासन निर्णय क्र. राआधो–४०१९(प्र.क्र. ३१/१६–अ, दि. १२/२/२०१९ व शासन निर्णय क्र. शाशिक्री/एमआयएस–४७१९/प्र.क्र.४५७/एसएम२ दि. २८/५/२०१९ मधील अटी व शर्तींचे पालन करावे.

**९.३ सामाजिक आरक्षण :** सामाजिक आरक्षण खालीलप्रमाणे राहील.

१) प्रकल्पग्रस्त/आपत्तीग्रस्त – ३% २) लक्षणीय अपंग – ५%

३) माजी सैनिक पाल्य – ३% ४) आजी सैनिक पाल्य – २%

५) विधवा/घटस्फोटित/अनाथ महिला – २% ६) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य – १%

**९.४ डोंगरी क्षेत्रातील आरक्षण :** शासन निर्णय क्र. टीसीएम १०९७/२३९७/माशि–४, दिनांक १ जुलै १९९७ अन्वये महाराष्ट्र शासनाने राज्यातील काही जिल्ह्यांतील काही तालुके व गावे डोंगरी क्षेत्र म्हणून जाहीर केलेली आहेत. राज्यातील सदर **डोंगरी क्षेत्रातील** एकूण प्रवेश क्षमतेच्या २०% जागा डोंगरी क्षेत्रातील उमेदवारांसाठी आरक्षित राहतील. (नियम क्र. १८.१८ पाहावा.)

**९.५ महिलांसाठी आरक्षण :** शासन निर्णय महिला व बालविकास क्र. ८२/२००१/ मसेआ/२०००/ प्र. क. ४१५/का–२ दि. २५–५–२००१ अन्वये एकूण प्रवेश क्षमतेच्या **३० टक्के जागा महिला** उमेदवारांकरिता राखीव राहतील. ह्या आरक्षणांतर्गत महिलांना प्रवेश देण्याची कार्यवाही सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करण्यात येईल.

**९.६ आदिवासी उमेदवारांसाठी विशेष आरक्षण :** चिखलदरा, जि. अमरावती; धानोरा, जि. गडचिरोली; किनवट, जि. नांदेड; गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर येथील अध्यापक विद्यालयांमध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या ७०% जागा आदिवासी उमेदवारांकरिता राखीव राहतील. बिरसामुंडा, अ. वि. सिरोंचा, जि. गडचिरोली येथील ५०% जागा आदिवासी उमेदवारांकरिता राखीव राहतील.

**९.७ सीमावर्ती भागातील अध्यापक विद्यालय :** महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवरील वादग्रस्त ८६५ गावांतील विद्यार्थ्यांच्या डी. एल. एड. प्रवेशासाठी एकंबेकर अध्यापक विद्यालय, उद्गीर, जि. लातूर **हे स्वतंत्र अध्यापक विद्यालय** आहे. **(नियम क्र. १८.१९ व १८.२० पहावा.)**

**९.८ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी वैधता प्रमाणपत्राबाबत –**

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपूर्व जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता हमीपत्र लिहून देण्याची अट आदिवासी विकास विभागाने दिनांक ११/०१/२०११ रोजीच्या परिपत्रकान्वये रद्द केलेली आहे.**

**अनुसूचित जमातीच्या (एस. टी.) विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मूळ प्रत व जात वैधता प्रमाणपत्र मूळ प्रत प्रवेश अर्ज पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.**

**१०) आरक्षणाबाबत संवर्गांतर्गत बदल**

**१०.१** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती – अ, भटक्या जमाती – ब, भटक्या जमाती – क, भटक्या जमाती – ड, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्याकरिता वैधानिक आरक्षणानुसार आरक्षित असलेल्या जागेवर किमान गुणापर्यंत जाऊनही पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुसूचित जातीची रिक्त जागा अनुसूचित जमातीस, अनुसूचित जमातीची रिक्त जागा विमुक्त जाती (अ) ला, विमुक्त जाती (अ) ची रिक्त जागा भटक्या जमाती (ब) ला, भटक्या जमाती (ब) ची रिक्त जागा भटक्या जमाती (क) ला, भटक्या जमाती (क) ची रिक्त जागा भटक्या जमाती (ड) ला, भटक्या जमाती (ड) ची रिक्त जागा विशेष मागास प्रवर्गाला, विशेष मागास प्रवर्गाची रिक्त जागा इतर मागास वर्गाला व इतर मागास वर्गाची रिक्त जागा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गाला व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण प्रवर्गाला देऊन गुणवत्तेनुसार रिक्त जागा भरण्यात येतील.

**१०.२** त्या त्या संवर्गातील किमान गुणाअखेर सामाजिक आरक्षणानुसार आरक्षित जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा संवर्गानुसार सामाजिक आरक्षण मुक्त समजण्यात येतील व त्या संवर्गातील प्युअर गटास दिल्या जातील.

**११) उपस्थिती**

**११.१** प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासाठी प्राथमिक शिक्षण पदविकेकरिता २०० दिवस (परीक्षा व प्रवेशाचे दिवस वगळून) कार्यदिन राहतील.

**११.२** प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी एकूण ८० टक्के उपस्थिती आवश्यक राहील. तसेच वर्षाच्या प्रत्येक सत्रातील किमान उपस्थिती ६० टक्के राहील. आंतरवासितेसाठी ९० टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

शासनामार्फत उशिरा प्रवेश अथवा वैद्यकीय कारणास्तव विहित केलेली उपस्थिती कमी पडत असल्यास सदर अनुपस्थिती क्षमापित करण्याचे अधिकार पुढीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.

७० ते ७९ टक्के – प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

६० ते ६९ टक्के – अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

प्रथम /द्वितीय सत्रामध्ये ६० टक्क्यापेक्षा कमी उपस्थिती असल्यास परीक्षेस प्रविष्ट होण्यास उमेदवार अपात्र समजण्यात येईल. **कमी उपस्थिती क्षमापित करण्याचे अधिकार वापरताना त्या वर्षीच्या प्रत्येक सत्रातील उपस्थिती किमान ५० टक्के आहे याची खात्री करावी.**

**११.३ प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम**

अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी प्रथम सत्र सुरू दिनांकापासून दोन वर्षे असा असेल. सन २०१६–१७ मध्ये डी.एल.एड्. सुधारित अभ्यासक्रमास शासन निर्णय क्र. अभ्यास २११४/(२११/१४)– एसडी.४ दि. १७/५/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांच्या मूल्यमापनाबाबतचे नियम प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**११.४** प्रथम वर्ष परीक्षेनंतर लगेच द्वितीय वर्षाचे अध्यापन सुरू होईल. द्वितीय वर्ष प्रवेशाबाबतचे नियम प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रम पुस्तिकेमध्ये राज्य शिक्षक प्रशिक्षण शाखेद्वारे निर्गमित करण्यात आलेले आहेत.

## १२) शुल्क सन २०२२-२३

### १२.१ शासकीय व अनुदानित अध्यापक विद्यालय

| क्र. | शुल्क/बाब | शुल्क दर रु. | वार्षिक रु. |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण शुल्क (दरमहा) | २२० | २६४० |
| २ | सत्र शुल्क (प्रति सत्र) | २२० | ४४० |
| ३ | प्रवेश शुल्क (प्रथम व द्वितीय वर्षाचे मिळून) | २२० | २२० |
| | वार्षिक एकूण रुपये | | ३३०० |

द्वितीय वर्षासाठी प्रवेश शुल्क वगळता उर्वरित शुल्क भरावे लागेल.

### १२.२ विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालय

प्रवेश घेताना विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातील शैक्षणिक शुल्क हे **'अध्यापक विद्यालय विनियमन प्राधिकरणा'**ने मान्य केलेल्या दरानुसार भरावे लागेल.

**१२.३** वरील शुल्काव्यतिरिक्त कोणत्याही अध्यापक विद्यालयास अन्य शुल्क आकारता येणार नाही.

### १२.४ शुल्क भरण्याची कार्यपद्धती :

१) शासकीय व अनुदानित अध्यापक विद्यालयातील प्रवेशार्थींना १२.१ मध्ये दर्शविलेल्या दराने १ वर्षाचे शुल्क प्रवेशाच्या वेळी भरावे लागेल.

२) विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाचे शैक्षणिक शुल्क हे अध्यापक विद्यालयाच्या विनियमन प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या दराने प्रवेशाच्या वेळी एका वर्षाचे शुल्क भरणे आवश्यक आहे. दुसऱ्या वर्षाचे शुल्क स्वतंत्रपणे दुसऱ्या वर्षी प्रवेशाच्या वेळी भरावे लागेल.

३) ज्या विनाअनुदानित अध्यापक विद्यालयाचे शुल्क विनियमन प्राधिकरणाने निश्चित केले नाही त्यांच्याबाबत तूर्त **रु. १२०००/-** वार्षिक शुल्क आकारण्यात येईल व प्राधिकरणाने निश्चित केल्यानंतर फरक समायोजित करावा लागेल.

४) प्रवेश निश्चित झाल्यानंतर संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांच्या नावे वार्षिक शुल्काचा डिमांड ड्राफ्ट काढून तो संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांकडे जमा करण्यात यावा.

## १३) शुल्क परतावा -

| क्र. | कालावधी | शुल्कात करावयाची कपात |
|---|---|---|
| १. | अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत प्रवेश रद्द केल्यास | १०% |
| २. | अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून ८ ते १५ दिवसांच्या दरम्यान प्रवेश रद्द केल्यास | २५% |
| ३. | अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून १६ ते ३० दिवसांच्या दरम्यान प्रवेश रद्द केल्यास | ५०% |
| ४. | अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतल्याच्या तारखेपासून ३० दिवसांनंतर प्रवेश रद्द केल्यास | कोणताही परतावा अनुज्ञेय असणार नाही. |

**१३.२ शुल्क परताव्याचा कालावधी**

उमेदवाराने संबंधित अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश रद्द करण्याकरिता अर्ज सादर केल्यास असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत शुल्कात योग्य ती कपात करून उर्वरित रक्कम संबंधित अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांकडून विद्यार्थ्यांस परत करण्यात येईल. प्राचार्यांनी कपात केलेली रक्कम जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत **'अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश, निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समिती, पुणे ' यांच्याकडे डी. डी. ने पाठवावी.**

**१४) आपआपसात अध्यापक विद्यालयात बदली**

**१४.१** महाराष्ट्रातील शासन मान्य कोणत्याही अध्यापक विद्यालयातून कोणतेही अध्यापक विद्यालय स्वच्छेने व शासनमान्य फी भरून एकतर्फी प्रथम वर्षात जागा रिक्त असल्यास बदली करता येईल. एकतर्फी बदलीचे अधिकार नियम १४.२ प्रमाणे राहतील. बदली अर्जासोबत रु. १०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. जोडावा.

**१४.२** आपआपसात बदलीसाठी पुढील सक्षम अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. (आपआपसात बदली अर्जाचा विहित नमुना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी वेबसाईटवर परिशिष्ट ७ मध्ये दिला आहे.)

अ) जिल्ह्यांतर्गत बदली - प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (D.I.E.T.)

ब) विभागांतर्गत बदली - संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक

क) विभागाबाहेर बदली - संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**१४.३** बदली कोणत्याही स्तरावर एकदाच करता येईल. एकदा संमती दिल्यावर ती रद्द करता येणार नाही. बदली झाल्यानंतर बदली उमेदवार त्या अध्यापक विद्यालयात हजर न झाल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व बदलीने गेलेला दुसरा उमेदवार आपल्या मूळ अध्यापक विद्यालयातच उपस्थित राहील.

**१४.४** आपआपसात बदलीच्या अर्जासोबत प्रत्येक उमेदवाराने शुल्क म्हणून रु. १०००/- चा राष्ट्रीयीकृत बँकेचा डी. डी. आवश्यक राहील. जिल्ह्यांतर्गत बदलीचा डी. डी. संबंधित जिल्ह्याचे प्राचार्य, जि. शि. प्र. सं. यांच्या नावे काढावा. विभागांतर्गत व विभागाबाहेर बदलीसाठीचा डी. डी. हा **अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश सनियंत्रण समिती, पुणे** यांच्या नावे काढावा.

**१४.५** महाराष्ट्रातील शासन मान्य कोणत्याही अध्यापक विद्यालयातून कोणत्याही अध्यापक विद्यालयात स्वेच्छेने शासनमान्य फी भरून आपापसात बदली करता येईल. आपापसात बदलीचे अधिकार पूर्वी प्रमाणेच नियम १४.२ नुसार असतील.

**१४.६** आपआपसात बदली प्रवेश घेतल्यानंतर केली जाईल. त्याची अंतिम मुदत राज्यस्तरीय किंवा विभागस्तरीय अंतीम प्रवेश फेरी संपल्यानंतर (सर्व फेरीतील विद्यार्थ्यांना) ३० दिवस राहील. **ज्या दोन विद्यार्थ्यांना आपआपसात अध्यापक विद्यालय बदलावयाचे आहे त्या दोन्ही विद्यार्थ्यांनी नियम क्र. १४.२ मध्ये नमूद केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत.**

**१४.७** विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालयातून विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालयात बदली करताना उमेदवाराने अध्यापक विद्यालयाकडे भरलेले शुल्क प्राचार्यांनी बदली उमेदवाराच्या नावावर समायोजित करावे.

**१४.८** उमेदवाराची ज्या अध्यापक विद्यालयात बदली झालेली आहे त्या अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी बदलून आलेल्या उमेदवाराची ऑनलाईन प्रणालीमध्ये आवश्यक ती कागदपत्रे जोडून (Upload) नोंद करून घ्यावी. यासाठी प्राचार्य अध्यापक विद्यालय यांनी बदली झालेल्या उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश जोडावेत.

**१४.९** व्यवस्थापन कोट्यातील झालेल्या प्रवेशाची कोणत्याही प्रकारे बदली करता येणार नाही.

**१५) द्वितीय वर्ष प्रवेश**

**१५ अ)** १) प्राथमिक शिक्षण पदविका अभ्यासक्रमाची प्रथम वर्षाची परीक्षा झाल्यानंतर अभ्यासक्रमाचे द्वितीय वर्ष लगेचच सुरू होईल.

२) द्वितीय वर्षासाठी प्रथम वर्षाची परीक्षा दिलेल्या सर्व छात्राध्यापकांना प्रथम वर्ष परीक्षेच्या निकालामध्ये द्वितीय वर्ष प्रवेशासाठी पात्र होण्याच्या अटीवर तात्पुरता प्रवेश संबंधित प्राचार्यांनी छात्राध्यापकांकडून हमीपत्र घेऊन द्यावा.

**१५ ब) द्वितीय वर्ष पुनर्प्रवेश :**

वैद्यकीय कारणास्तव किंवा संबंधित विद्यार्थ्यांच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे किंवा अपरिहार्य कारणामुळे प्रथम वर्ष उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याचा द्वितीय वर्ष पुनर्प्रवेश–एक वर्षापेक्षा कमी कालावधीचा खंड क्षमापित करून त्याला द्वितीय वर्षात प्रवेश देण्याचा अधिकार **विभागीय शिक्षण उपसंचालक** यांना राहील. अशा पुनर्प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने **डी.एल.एड.** पदविकेस प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त **तीन वर्षात** सदर पदविका पूर्ण करणे अनिवार्य राहील. वैद्यकीय कारणास्तव खंड असल्यास अर्जासोबत जिल्हा शल्य चिकित्सक/अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

द्वितीय वर्षात पुनर्प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचा खंड क्षमापित करून वरील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी द्वितीय वर्षाच्या पुनर्प्रवेशास मान्यता दिल्यास अशा विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षाचे संपूर्ण शुल्क पुनःश्च भरावे लागेल.

**१५ क) द्वितीय वर्षातील बदली**

**१५.१** अध्यापक विद्यालयात द्वितीय वर्षात रिक्त जागा असल्यास एकतर्फी बदली करता येईल. त्यासाठी ज्या अध्यापक विद्यालयात जागा रिक्त आहेत त्या अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांची संमती/ना हरकत दाखला जोडणे आवश्यक आहे. तो बदलीचा अर्ज नियम क्रमांक १४.२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे **प्रथम वर्षाच्या परीक्षेनंतर ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.** मात्र एकतर्फी बदलीने ज्या अध्यापक विद्यालयात बदली होणार आहे त्या अध्यापक विद्यालयाची मंजूर फी उमेदवारास भरावी लागेल.

**१५.२** द्वितीय वर्षातील एकतर्फी बदलीच्या अर्जासोबत प्रक्रिया शुल्क म्हणून रु. १०००/– चा **'राष्ट्रीयकृत बँकेचा डी. डी.'** आवश्यक राहील. जिल्ह्यांतर्गत बदलीचा डी. डी. संबंधित जिल्ह्याचे प्राचार्य, जि. शि. प्र. सं. यांच्या नावे काढावा. विभागांतर्गत व विभागाबाहेर बदलीसाठीचा डी. डी. **''अध्यक्ष राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे''** यांच्या नावे काढावा.

**१५.३** व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारे बदली करता येणार नाही.

**१६) खाजगी व्यवस्थापन कोटा प्रवेश (अल्पसंख्याकासह)**

**१६.१** व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने online अर्ज करणे बंधनकारक आहे.

**१६.२** अल्पसंख्याक व्यवस्थापनाने चालविलेल्या अध्यापक विद्यालयात प्रवेशाची कार्यवाही शासन निर्णय क्र. अशैसं २०१२/प्र.क्र.२१/का–५ दि. २७/५/२०१३ आणि शासन परिपत्रक १८ जून २०१४ नुसार करावी.

**१६.३** व्यवस्थापन कोट्याच्या प्रवेशासाठी संबंधित व्यवस्थापनाने जिल्ह्यातील जास्त खपाच्या वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी. त्यामध्ये घटनात्मक व सामाजिक आरक्षण द्यावे. तसेच माहितीपुस्तिका व अर्जाची किंमत, अर्ज मिळण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकृतीचा अंतिम दिनांक नमूद करणे आवश्यक राहील. व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश करताना शाखानिहाय आरक्षणाबाबत शासन पत्र क्र. टीसीएम २००५/(४१/०५)/माशि४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक ३०.०८.०५ अन्वये कार्यवाही करावी.

१६.४ व्यवस्थापन कोट्याच्या प्रवेशासाठी संबंधित व्यवस्थापनाने राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समितीच्या प्रवेश पद्धतीच्या अनुरूप वेळापत्रक तयार करून प्रवेश वेळापत्रकास जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांची मान्यता घेणे व्यवस्थापनावर बंधनकारक राहील. या वेळापत्रकाच्या मान्यतेची एक प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देणे आवश्यक आहे. व्यवस्थापन त्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक नोटीस बोर्डावर जाहीर करेल.

१६.५ व्यवस्थापन कोट्याचे प्रवेश करताना शासकीय कोट्याच्या प्रवेशाची नियमावली परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावरून घेणेबाबत कळवावे. (विनाअनुदानित अल्पसंख्याक संस्था वगळून)

१६.६ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाची प्रत सादर केल्यानंतर संबंधित अध्यापक विद्यालयाकडून विहित नमुन्यातील पोहोच देणे बंधनकारक राहील.

१६.७ प्राप्त झालेल्या सर्व विहित नमुन्यांतील अर्जावर आवक क्रमांक टाकून आवक नोंद रजिस्टर स्वतंत्र ठेवावे व दररोज नोंदवून झालेली आवक संपल्यावर प्राचार्यांनी स्वाक्षरी करावी.

१६.८ प्राप्त सर्व अर्जांची छाननी करून शाखानिहाय व संवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून नोटीस बोर्डवर जाहीर करावी. तसेच गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना डाक नोंदपत्राने (आरपीएडी) ने अथवा ई–मेलद्वारे कळविणे बंधनकारक राहील व निवड झालेल्या उमेदवारांची (डाकनोंद पत्राने कळविलेल्या) यादी, सूचना फलकावर लावावी.

१६.९ प्रवेशाबाबतचे पत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने ४ दिवसांच्या आत अध्यापक विद्यालयात समक्ष जाऊन आवश्यक ती कागदपत्रे सादर करून नियमानुसार फी भरून प्रवेश घ्यावा. जर संबंधित अध्यापक विद्यालयाने प्रवेश नाकारला अथवा टाळाटाळ केली तर संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे लेखी तक्रार ८ दिवसांच्या आत नोंदवावी.

१६.१० व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशाकरिता शासनाने विहित केलेले शाखानिहाय आरक्षण राहील.

१६.११ व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशाकरिता मागासवर्गीय व सामाजिक आरक्षणातील विद्यार्थी उपलब्ध होत असल्यास घटनात्मक व सामाजिक आरक्षण पाळणे बंधनकारक राहील.

**१६.१२ व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश करताना घटनात्मक व सामाजिक आरक्षण पाळण्याबाबत किमान ३ वेळा जाहिरात देणे बंधनकारक आहे. ३ वेळा जाहिरात देऊनही उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षण बदलाबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडून आदेश घ्यावेत.**

१६.१३ अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशांची यादी विहित मुदतीत मान्यतेसाठी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे online forward करावी.

१६.१४ व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशाची यादी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी विहित मुदतीत मंजूर किंवा नामंजूर केल्याचा निर्णय घेऊन संबंधित व्यवस्थापनास कळवावा.

१६.१५ विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी वरील प्रवेशाची यादी प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्याकडे १० दिवसांच्या आत सादर करावा.

१६.१६ व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी आपला प्रवेश संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी मान्य किंवा अमान्य केला याची खात्री प्राचार्यांकडून त्वरित करून घ्यावी. **व्यवस्थापनाचे प्रवेश अमान्य केल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही व त्यामुळे संबंधितांच्या होणाऱ्या नुकसानीस शासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.**

**१६.१७** प्रवेश नियमावलीतील कोणत्याही तरतुदीचा भंग करणे, या आदेशातील कोणत्याही बाबीसंबंधात असलेल्या आदेशाचे उल्लंघन करणे इ. बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकाकडून त्याबाबतची शहानिशा करून घेईल. त्याबाबत अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती जो निर्णय घेईल तो संबंधित अध्यापक विद्यालयावर व त्यांच्या व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.

**१७)** डी.एल.एड. ऑनलाईन प्रवेशासंबंधी काही अडचण असल्यास उमेदवाराने परिषदेच्या वेबसाईटवरील दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**१८)** **प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे**

**१८.१** शिक्षण मंडळाची इ. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिकाची मूळ प्रत / सी. बी. एस. ई./आय. सी. एस. ई./एन. आय. ओ. एस./इतर राज्य मंडळाची इ. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रकाची मूळ प्रत तसेच मुंबई हिंदी विद्यापीठाची भाषारत्न परीक्षा/ यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिकाची मूळ प्रत सी. बी. एस. ई./आय. सी. एस. ई./एन. आय. ओ. एस./इतर राज्य मंडळ उमेदवारांच्या बाबतीत महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असल्याचे संबंधित **तहसीलदार** यांच्याकडील प्रमाणपत्राची मूळ प्रत. (विनाअनुदानित अल्पसंख्यांक अध्यापक विद्यालय वगळून)

**१८.२** इयत्ता १० वी उत्तीर्ण झाल्याचे संबंधित मंडळाचे गुणपत्रक मूळ प्रत/प्रमाणपत्र.

**१८.३** इ. १२ वीचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा अन्य संस्थेत प्रवेश घेतला असल्यास त्या संस्थेचे बोनाफाइड प्रमाणपत्र.

**१८.४** मागासवर्गीयांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जात प्रमाणपत्राची मूळप्रत.

**१८.५** खूल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या प्रवर्गासाठी पात्र असणाऱ्या उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६–अ दि. १२.०२.२०१९ सोबतचे सहपत्र 'परिशिष्ट अ' नुसार विहित नमुन्यातील सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**१८.६** अनुसूचित जमातीच्या (एस.टी.) विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मूळ प्रत व जात वैधता प्रमाणपत्र मूळ प्रत. (नियम क्र. ९.९ पाहावा.)

**१८.७** व्ही. जे. ए., एन. टी. बी., एन. टी.सी., एन. टी. डी., एस. बी. सी., ओ.बी.सी. या संवर्गातून प्रवेशाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वैध कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र बंधनकारक राहील.

**१८.८** चित्रकलेच्या बाबतीत इंटरमिजिएट परीक्षेचे कला संचालनालयाचे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेली निकालपत्राची सत्यप्रत.

**१८.९** इतर राज्य मंडळातून इ. १२ वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे नोटरीकडून हिंदी/इंग्रजी भाषेत रूपांतरित करून घेणे आवश्यक आहे.

**सामाजिक आरक्षणांतर्गत येणाऱ्या उमेदवारांना त्यांना ते ज्या सामाजिक आरक्षणास पात्र आहेत त्या संदर्भात खालील प्रमाणपत्रे सादर करावी लागतील.**

**१८.१० लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या उमेदवारांसाठी आरक्षण :** किमान ४०% अपंग असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक/अधिष्ठाता यांचे प्रमाणपत्र असलेले उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र राहतील उमेदवाराचे अपंगत्व शिक्षकी पेशास बाधा आणणारे नसावे. शिक्षकी पेशास बाधा आणणाऱ्या अपंगत्वाबाबत निर्णय घेण्यास प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती सक्षम राहील. लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या ५% जागांवर प्रवेश देतेवेळी केंद्रशासनाच्या The Rights of Person with Disabilities Act 2016 च्या कलम ३२(१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. एमआयएस४७१९/प्र.क्र.४५७/एसएम २ दि. २८ मे २०१९ या निर्णयातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**१८.११ प्रकल्पग्रस्त** : सदरहू प्रमाणपत्र जिल्हा पुनर्वसन अधिकारी/सक्षम अधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांचे असणे व त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नामनिर्देशन केलेले असणे व यापूर्वी याचा लाभ घेण्यात आलेला नाही असे प्रमाणित असणे आवश्यक आहे. सदरच्या प्रमाणपत्रामध्ये **''शैक्षणिक लाभासाठी देण्यात आलेले आहे''** असा उल्लेख असावा.

**१८.१२ आपत्तीग्रस्त** : तहसीलदार अथवा उपविभागीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक. प्रमाणपत्रात उमेदवारांचे नामनिर्देशन केलेले असणे व यापूर्वी याचा लाभ घेण्यात आलेला नाही असे प्रमाणित असणे आवश्यक आहे. सदरच्या प्रमाणपत्रामध्ये **''शैक्षणिक लाभासाठी देण्यात आलेले आहे''** असा उल्लेख असावा.

**१८.१३ माजी सैनिक पाल्य** : मुलगा/अविवाहित मुलगी/मृतसैनिकाची पत्नी–जिल्हा सैनिक बोर्डाचे (आर्मी/वायुसेना/नौसेना) यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. माजी सैनिकांच्या पहिल्या तीन अपत्यांना या आरक्षणाचा लाभ घेता येईल. नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक **तसेच डिस्चार्ज बुक आवश्यक आहे.**

**१८.१४ आजी सैनिक पाल्य :** १) पत्नी/मुलगा/अविवाहित मुलगी–(आजी सैनिक सेवेत असल्याचा दाखला.) २) आजी सैनिकाच्या ओळखपत्राची सत्यप्रत ३) आजी सैनिकांच्या पहिल्या तीन अपत्यांनाच आरक्षणाचा लाभ घेता येईल,संबंधित पाल्याचा नातेसंबंध दाखविणारा पुरावा.

**१८.१५ विधवा** : १) ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका/कटक मंडळे यांच्याकडून प्राप्त झालेले पतीच्या मृत्यूचे प्रमाणपत्र २) लग्न झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला ३)पुनर्विवाह न केल्याचे शपथपत्र असणे आवश्यक आहे.

**१८.१६ घटस्फोटिता**

१) विवाहनोंदणी दाखला

२) न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश आवश्यक (दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदविलेले घटस्फोटाचे प्रमाणपत्र/शपथपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच नोटरीचे प्रमाणपत्र गृहीत धरले जाणार नाही.)

३) मुस्लिम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी/इमामांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र असे प्रमाणपत्र नोटरीकडून मराठी/इंग्रजी भाषेत रूपांतरित करून घेणे आवश्यक आहे.

**१८.१७ अनाथ** : ही सवलत फक्त अनाथ महिलांसाठीच लागू राहील व त्यासाठी शासनमान्य/शासकीय अनाथ आश्रमात राहत असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**१८.१८ स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य** : शासन परिपत्रक क्र. टीसीएम २००१/प्र. क्र.२१४/माशि–४ दिनांक ११ फेब्रु. २००३ नुसार स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित केलेल्या पाल्यास नोकरीविषयक सवलतीचा लाभ अथवा डी. एल. एड. प्रवेशातील १% आरक्षणाचा लाभ यापैकी एकाची निवड करावी लागेल. या नामनिर्देशित पाल्यांनी डी. एल. एड. प्रवेशातील सवलतीच्या (१% आरक्षणाचा) लाभाची निवड केल्यास त्यांना जिल्हा अधिकाऱ्याकडे तसा अर्ज करावा लागेल.

**१८.१९ अ) डोंगरीक्षेत्र आरक्षण** : महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या डोंगरी क्षेत्रातील उमेदवारांना या आरक्षणाचा फायदा मिळेल. या आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी उमेदवारांनी त्यांचे इ. १ ली ते इ. १० वी पर्यंतचे शिक्षण डोंगरी क्षेत्रात घेतलेले असणे आवश्यक आहे. डोंगरी क्षेत्रात जर किमान इ. १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय नसेल तर अशा उमेदवारांकरिता त्यांचे किमान इ. ७ वी पर्यंतचे शिक्षण डोंगरी क्षेत्रात होणे आवश्यक आहे व ज्या डोंगरी क्षेत्रात किमान इ. ७ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध नसेल, अशा उमेदवारांच्या बाबतीत किमान इ.१ ली ते इ. ४ थी पर्यंतचे शिक्षण शासनाने घोषित केलेल्या डोंगरी क्षेत्रातील असणे आवश्यक आहे. ज्या वर्गापर्यंत डोंगरी क्षेत्रात शिक्षणाची सोय असतानाही उमेदवाराने डोंगरी क्षेत्राबाहेर शिक्षण घेतलेले असेल तर तो या

आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र समजला जाणार नाही. डोंगरी क्षेत्रातील आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराला संबंधित तालुक्याच्या **गटशिक्षणाधिकारी** यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव, शाळेचे नाव, कोणत्या इयत्तेपर्यंत शिकला त्याचा उल्लेख व त्या ठिकाणी कोणत्या वर्गापर्यंतच्या शिक्षणाची सोय आहे त्याचा उल्लेख व सदर उमेदवाराचे नाव त्या शाळेच्या जनरल रजिस्टरमध्ये असणे आवश्यक आहे व तसेच सदर गाव डोंगरी क्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णयानुसार सदर गाव डोंगरी क्षेत्रात असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**१८.१९ ब) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी डोंगरी आरक्षण** : जे विद्यार्थी शासनाने घोषित केलेल्या डोंगरी गावचे रहिवासी आहेत परंतु सामाजिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कारणांमुळे इ.१ ली पासूनच्या शिक्षणासाठी आदिवासी विभागाच्या शासकीय व अनुदानित किंवा समाजकल्याण विभागाच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतात. अशा विद्यार्थ्यांनी सदरच्या आश्रमशाळेत इ. १ ली ते इ. ७ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असेल तर अशा विद्यार्थ्यांना डोंगरी आरक्षणाचा (२०%) लाभ देण्यास हरकत नाही. त्यासाठी इतर डोंगरी क्षेत्रातील विद्यार्थ्यांप्रमाणेच आश्रमशाळेतील त्या विद्यार्थ्यांना डोंगरी क्षेत्राचा लाभ घ्यावयाचा आहे, अशा विद्यार्थ्यांचे गाव शासनाने डोंगरी गाव म्हणून घोषित केले आहे, याबाबत त्या तालुक्याच्या **गटशिक्षणाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र** सादर करणे आवश्यक राहील.

**१८.२० सीमावर्ती भागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांचे प्रवेश** :

महाराष्ट्र–कर्नाटक सीमेवरील ८६५ वादग्रस्त गावांतील विद्यार्थांच्या डी.एल.एड. प्रवेशासाठी दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालय उदगीर, जिल्हा लातूर येथे एक स्वतंत्र अध्यापक विद्यालय आहे. सदर विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी सीमावर्ती भागातील विद्यार्थ्यांसाठी २० जागा राखीव आहेत.

**१८.२१ सीमावर्ती भागातील ८६५ वादग्रस्त** गावांतील विद्यार्थी मराठी माध्यमाच्या अध्यापक विद्यालयामध्ये गुणवत्तेनुसार (दिलीप एकंबेकर अध्यापक विद्यालया व्यतिरिक्त) इतरत्र अर्ज करण्यास पात्र आहेत. तसेच त्यांनी त्यासाठी नियमानुसार स्वतंत्र अर्ज भरावेत.

❖❖❖

# परिशिष्ट – १

## डी.एल.एड. प्रवेशप्रक्रिया सन २०२२–२३ चे शासकीय कोट्यातील प्रवेश असे होतील.

१) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमधील सर्व प्रवेश शाखा, संवर्ग, माध्यमनिहाय उपलब्ध जागांसाठी गुणवत्तेनुसार ऑनलाईन (Online) पद्धतीने होतील.

२) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र च्या www.maa.ac.in या संकेत–स्थळावर उपलब्ध असेल.

३) पडताळणी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याने अर्जासोबत upload केलेल्या प्रमाणपत्राची Online पडताळणी करून approve केल्यानंतरच तो अर्ज प्रवेशप्रक्रियेत समाविष्ट होईल.

४) उमेदवारास ७०% मधून प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने स्वतःच्या शैक्षणिक विभागातील अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रम दयावेत व ३०% मधून प्रवेश घ्यावयाचा असल्यास आपला शैक्षणिक विभाग सोडून इतर विभागातील अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रम दयावेत.

५) संपूर्ण भरलेल्या अर्जांची माध्यमनिहाय व शाखानिहाय गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. सदरची गुणवत्ता यादी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र च्या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध असेल.

६) उमेदवाराने दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार उपलब्ध जागांमधून गुणवत्तेनुसार उमेदवाराचा प्रवेश निश्चित होईल.

७) उमेदवाराला गुणवत्तेनुसार Allotment मिळाल्यावर प्रवेशपत्र त्याच्या स्वतःच्या Login मध्ये व त्याने Register केलेल्या Email ID वरून प्राप्त करून घेता येईल.

८) प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने अध्यापक विद्यालयाच्या वार्षिक शुल्क एवढ्या रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डी. डी. घेऊन सर्व मूळ प्रमाणपत्रांसह अध्यापक विद्यालयात चार दिवसांच्या आत जावे.

९) संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांनी पुनश्च उमेदवाराच्या मूळ प्रमाणपत्रावरून पडताळणी करावी.

१०) तद्नंतरच अध्यापक विद्यालयाचे **प्राचार्य उमदेवाराला त्यांचे Login ID मधून Online admit करतील.** अध्यापक विद्यालय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना Online admit करताना विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावरील verification code enter करावा व संबंधित विद्यार्थ्याला Online admit करून घ्यावे. विद्यार्थ्याला Online admit न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची जबाबदारी संबंधित अध्यापक विद्यालय, प्राचार्यांची राहील.

११) पडताळणीमध्ये काही त्रुटी आढळल्यास अध्यापक विद्यालय प्राचार्य यांनी स्वतःच्या Login मधून reject करावे.

१२) पहिल्या फेरीनंतर विद्यार्थ्यांस प्रत्येक फेरीला उपलब्ध रिक्त जागानुसार प्रत्येक फेरीपूर्व निश्चित केलेल्या विहित कालावधीत पसंतीक्रम बदलण्याची मुभा राहील. सदर कालावधीत एखाद्या विद्यार्थ्याने न बदलल्यास त्या विद्यार्थ्यांचे मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहतील. तथापि पहिला पसंतीक्रम दिलेल्या अध्यापक विद्यालयात विद्यार्थ्यांस प्रवेश मिळाला असल्यास सदर अध्यापक विद्यालयात पूर्ण फी भरून विद्यार्थ्याने प्रवेश घेणे बंधनकारक असेल. प्रवेशित विद्यार्थ्यांची नावे पुढील फेरीसाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

१३) प्रवेशासाठी विद्यार्थ्यांस Betterment ची एक संधी उपलब्ध असेल. उदा. विद्यार्थ्यांने भरलेल्या पसंतीक्रमातील **तिसऱ्या** क्रमांकाच्या अध्यापक विद्यालयात प्रथम फेरीत Allotment झाली आहे. परंतु त्या विद्यार्थ्यांस पहिल्या किंवा दुसऱ्या अध्यापक विद्यालयात प्रवेश हवा असेल तर दुसऱ्या फेरीत Betterment साठी पहिल्या व दुसऱ्या पसंतीक्रमाचा विचार होईल. मात्र Betterment ही फक्त upward direction मध्येच होईल. ज्या अध्यापक विद्यालयात प्रवेशाची Allotment झाली त्याच्या खालच्या पसंतीक्रमाचा Betterment साठी विचार होणार नाही.

१४) पहिल्या पसंतीक्रमा व्यतिरिक्त अन्य पसंतीक्रमाचे अध्यापक विद्यालय मिळाल्यास व ते विद्यार्थ्यांस मान्य असल्यास असे विद्यार्थी निर्धारित कालावधीत सदर अध्यापक विद्यालयात पूर्ण फी भरून आपले प्रवेश निश्चित करू शकतील. अशा प्रवेशित विद्यार्थ्यांचे नावे पुढील फेरीसाठी विचारात घेतली जाणार नाहीत. निर्धारित कालावधीत प्रस्तुत विद्यार्थ्यांनी संबंधित अध्यापक विद्यालयात प्रवेश निश्चित न केल्यास त्यांना पुढील फेरीसाठी पसंतीक्रम बदलण्यासाठी मुभा देण्यात येईल.

१५) प्रत्येक फेरीतील प्रवेश हे संवर्गनिहाय गुणवत्तेनुसार व विद्यार्थ्यांच्या पसंती क्रमानुसार होतील.

# परिशिष्ट – २

## डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेश अर्ज भरण्यासंबंधी सूचना सन २०२२–२३

१) उमेदवाराने डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेशासाठी परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर जावे. **प्रवेशाबाबतची नियमावली, प्रवेश अर्ज भरण्याबाबतच्या सूचना अर्ज भरण्याअगोदर काळजीपूर्वक वाचाव्यात.**

२) या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील D.El.Ed. यावर Click करावे.

३) यानंतर Online registration करून घ्यावे.

४) Registration करणेसाठी उमेदवाराचा स्वतःचा Email ID असणे आवश्यक आहे. **विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जात कॉलेज, प्राचार्य किंवा अध्यापक विद्यालयातील अन्य कर्मचाऱ्याचा Email ID व Mob No. टाकू नये.**

५) एका Email ID वर फक्त एकच विद्यार्थी प्रवेश अर्ज भरू शकेल. **(विद्यार्थ्यांनी स्वतःचा Email ID व Password अन्य व्यक्तीस देऊ नये)**

६) Registration करणेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास स्वतःचा User ID मिळेल. या User ID द्वारे उमेदवार स्वतःच्या Login मध्ये प्रवेश करू शकेल. (User ID जतन करून ठेवावा. प्रवेश प्रक्रिया संपेपर्यंत त्याचा उपयोग होणार आहे.)

७) प्रवेश अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःची मूळ प्रमाणपत्रे सोबत ठेवावी. त्या त्या ठिकाणी सदरची प्रमाणपत्रे उमेदवाराने Upload करावीत.

८) प्रवेश अर्जात उमेदवाराने सर्व माहिती अचूक व काळजीपूर्वक भरावी.

९) प्रवेश अर्जासाठी शुल्क – खुला संवर्ग – रु. २००/– (रु. दोनशे फक्त)
खुला संवर्ग वगळून अन्य संवर्ग – रु. १००/– (रु. शंभर फक्त)

सदर शुल्क Credit Card, Debit Card किंवा RTGS द्वारे Online भरावे लागेल.

१०) उमेदवाराने **किमान ३ आणि जास्तीत जास्त ५ अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रम द्यावेत.** एखाद्या माध्यमाची अध्यापक विद्यालये उपलब्ध नसल्यास जेवढी उपलब्ध असतील (१ किंवा २) तेवढे प्राधान्यक्रम भरावेत.

११) उमेदवारास त्याने दिलेल्या अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रमानुसार व गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. (उदा. 'प्रथम' प्राधान्याचा प्रथम विचार केला जाईल. प्रथम क्रमांकाच्या कॉलेजसाठी गुणवत्तेप्रमाणे प्रवेश मिळत नसल्यास अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, प्राधान्याचा विचार केला जाईल.)

१२) उमेदवाराने प्रवेश अर्ज शुल्क भरल्यानंतर त्यास अर्जात भरलेल्या माहितीत कोणताही बदल करता येणार नाही.

१३) उमेदवार एकापेक्षा जास्त माध्यमासाठी अर्ज करू शकतात. परंतु त्यासाठी त्याचे **स्वतंत्र शुल्क भरणे आवश्यक आहे.**

१४) उमेदवाराने संपूर्ण भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रिंट घ्यावी.

❖❖❖

## Online प्रवेश अर्ज पडताळणीबाबत

१) भरलेल्या प्रवेश अर्जाची पडताळणी काटेकोरपणे करावी.

२) पडताळणी अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या Login ID द्वारे प्रवेश करून आलेल्या उमेदवाराचा application ID टाकून त्याचा प्रवेश अर्ज Open करावा.

३) Online प्रवेश अर्जातील सर्व माहिती त्याने अपलोड केलेल्या प्रमाणपत्राचे आधारे तपासून विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज Online approve करावा.

४) प्रवेशअर्जात त्रुटी असल्यास पडताळणी अधिकाऱ्याने Move to correction यावर क्लिक करावे. तद्नंतर उमेदवारास correction करणेबाबतचा sms जाईल. त्यानुसार उमेदवाराने स्वत:चा अर्ज open करून correction करावे.

५) पडताळणी अधिकाऱ्यांनी अर्ज Online approve केल्याशिवाय त्याचा प्रक्रियेत समावेश होणार नाही.

६) एकदा अर्ज approve केल्यानंतर त्यात पडताळणी अधिकाऱ्यास कोणताही बदल करता येणार नाही.

७) पुढील प्रक्रियेसाठी उमेदवाराने वेळोवेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ची website पहावी.

८) प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे इ. १२ वी गुण, जात प्रवर्ग सामाजिक आरक्षण व विद्यार्थ्यांनी दिलेले प्राधान्यक्रम विचारात घेऊन Allotment दिली जाईल.

९) प्रवेशाबाबत Registered Mobile No. व Email ID वर वेळोवेळी दिलेल्या सूचना sms वाचून त्या प्रमाणे विद्यार्थ्यांनी कार्यवाही करावी.

१०) प्रवेशाच्या फेरीतून आपणास Allot केलेल्या कॉलेजची माहिती आपल्या Login मध्ये ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पाठविली जाईल.

११) पात्र विद्यार्थी ''प्रवेश पत्र'' घेऊन अध्यापक विद्यालयात आल्यावर प्राचार्यांनी मूळ प्रमाणपत्राची पडताळणी करून कागदपत्रे बरोबर असल्यास ''प्राचार्यांनी स्वतःच्या Login मधून विद्यार्थ्यांस Online admit करावे.'' कोणत्याही परिस्थितीत Online admit न केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही व जागा रिक्त राहिल्यास प्राचार्य स्वतः वैयक्तिक जबाबदार राहतील.

१२) **विद्यार्थ्यांकडे प्रवेशपत्र असल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यांस प्राचार्यांनी Online admit करू नये. (प्रवेश पत्राशिवाय admit करण्याचा प्राचार्यांना अधिकार नाही.)**

१३) Online admit केलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश दिल्याची **प्राचार्यांच्या सहीची पोहोच द्यावी.**

❖❖❖

## परिशिष्ट – ३

## प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

१. उमेदवाराने वेबसाईटवरील www.maa.ac.in नियमावली व सूचना पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी. वेबसाईटवरील Home मध्ये जाऊन प्रवेशाबाबतचे टप्पे (Flow Chart) माहीत करून घ्यावेत.

२. खुला संवर्ग वगळून अन्य संवर्गातील उमेदवार गुणवत्तेनुसार खुल्या (Open) संवर्गात प्रवेशास पात्र आहेत. त्यामुळे त्यांनी खुल्या प्रवर्गासाठी वेगळा दुसरा प्रवेश अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. त्यांनी फक्त अन्य संवर्गासाठीच असलेला अर्ज भरावा.

३. उमेदवाराने ऑनलाईन प्रवेश अर्ज काळजीपूर्वक भरावा.

४. प्रवेश अर्ज ऑनलाईन Submit केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल स्वीकारला जाणार नाही.

५. ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट काढून घ्यावी.

६. प्रवेशासाठी उमेदवार एकापेक्षा जास्त माध्यमांसाठी पात्र असल्यास त्यासाठी अध्यापक विद्यालयाचे स्वतंत्र पसंतीक्रम द्यावेत.

❖❖❖

# परिशिष्ट – ४
## प्रवेश अर्ज भरण्याबाबतच्या महत्त्वाच्या सूचना

१. डी.एल.एड. प्रवेशाचा Online अर्ज राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२. या संकेतस्थळावर उमेदवाराने स्वतःचे नाव नोंदविण्याची (Registration) प्रक्रिया पूर्ण करावी.

३. त्यानंतर उमेदवाराला स्वतःचा Login ID मिळेल.

४. Login ID द्वारे प्रवेश करून प्रवेश अर्ज Open करून स्वत: भरावा.

५. उमेदवार एकापेक्षा अधिक माध्यमासाठी प्रवेश अर्ज भरू शकतो परंतु त्यानुसार त्यास प्रत्येक माध्यमाचे स्वतंत्र शुल्क भरावे लागेल.

६. प्रवेश अर्ज शुल्क – खुला संवर्ग – रु. २००/–
खुला संवर्ग वगळून अन्य संवर्ग – रु. १००/–

७. उमेदवाराने प्रवेश अर्ज अत्यंत काळजीपूर्वक भरावा. **अपूर्ण व चुकीची माहिती** भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

८. अध्यापक विद्यालयाचे पसंतीक्रम भरताना उमेदवारास ज्या अध्यापक विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांची नावे प्राधान्यक्रमाने Online निवडावीत.

९. अर्जातील संपूर्ण माहिती भरल्यानंतर Submit या बटणावर क्लिक करावे व अर्जाची Print out काढून स्वत:कडे ठेवावी..

❖❖❖

## परिशिष्ट – ५

## डी.एल.एड. प्रथम वर्ष प्रवेशाच्या संदर्भात खालील उमेदवार अपात्र ठरतील.

१. इ. १२ वी ला ४९.५% पेक्षा कमी गुण असलेले खुल्या संवर्गातील उमेदवार.

२. इ. १२ वी ला ४४.५% पेक्षा कमी गुण असलेले राखीव संवर्गातील उमेदवार.

३. किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमातील (MCVC) नियम क्र. ६.४ मधील विषयांशिवाय इतर विषय घेऊन इ.१२ वी उत्तीर्ण झालेले उमेदवार.

४. महाराष्ट्र राज्याचे मूळ रहिवासी नसलेले उमेदवार.

५. वैकल्पिक विषयात २०० गुणांपेक्षा जास्त गुणांचा एक विषय घेऊन इ.१२ वी परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार.

### खालील कारणास्तव प्रवेश अर्ज अपात्र ठरविले जातील.

१. **अपूर्ण व चुकीची माहिती** भरलेले अर्ज.

२. छायांकित प्रती सोबत अपलोड न केलेले अर्ज.

३. विसंगत माहिती नोंद केलेले अर्ज.

४. पोस्टाने/कुरिअरने आलेले अर्ज.

५. उमेदवाराची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

❖❖❖

## परिशिष्ट – ६
## डोंगरी प्रमाणपत्र नमुना

१) कुमार/कुमारी : ---------------------------------------------

पत्ता : ------------------------------ तालुका : ------------------------

जिल्हा : ------------ यांचा दिनांक : -------------- चा दाखला मागणी अर्ज.

२) डोंगरी क्षेत्रासंबंधीचा शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग टीसीएम/१८९७(२३/९७) माशि ४/दि.१ जुलै १९९७.

### दाखला

दाखला देण्यात येतो की कुमार/कुमारी ---------------------------------------------

जनरल रजिस्टर क्रमांक ---------------- याने/हिने तालुका ----------- जिल्हा -----------

या डोंगरी क्षेत्रात खाली नमूद केलेनुसार शिक्षण घेतलेले आहे.

| इयत्ता | शाळा/विद्यालयाचे नाव | जनरल रजिस्टर क्रमांक | कोणत्या इयत्तेपर्यंत शिक्षणाची सोय आहे. | त्याच गावात शिक्षण झाले होय/नाही |
|---|---|---|---|---|
| १ ली | | | | होय/नाही |
| २ री | | | | होय/नाही |
| ३ री | | | | होय/नाही |
| ४ थी | | | | होय/नाही |
| ५ वी | | | | होय/नाही |
| ६ वी | | | | होय/नाही |
| ७ वी | | | | होय/नाही |
| ८ वी | | | | होय/नाही |
| ९ वी | | | | होय/नाही |
| १० वी | | | | होय/नाही |

**ठिकाण :**

**दिनांक :**

**गटशिक्षणाधिकारी (सही)**

**नाव :** -------------------------

पंचायत समिती -------------------

(शिक्का)

टीप : १) फक्त याच नमुन्यात दाखला स्वीकारण्यात येईल.

२) वरील नमुन्यात गटशिक्षणाधिकाऱ्यांनी होय/नाही यापैकी लागू असेल ते ठेवावे. लागू नसेल ते खोडावे.

## परिशिष्ट – ७

## आपापसात बदली नमुना अर्ज

**दिनांक :**

**१) मा. संचालक,**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे–३०.**

**२) मा. विभागीय शिक्षण उपसंचालक,** --------- **विभाग** ---------

**३) मा. प्राचार्य**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** --------

**विषय : जिल्हांतर्गत/विभागांतर्गत/आंतर विभागात आपापसात बदलीबाबत.**

महोदय,

प्राथमिक शिक्षण पदविका प्रवेश २०२२–२३ मधील नियमावली व माहिती पुस्तिकेतील नियम क्र. १४ नुसार आम्ही खाली स्वाक्षरी करणारे छात्र अध्यापक **जिल्हांतर्गत/विभागांतर्गत/आंतर विभागात** आपापसात बदली करू इच्छितो. सोबत आमच्या दोघांच्या/दोघींच्या प्रवेशपत्राच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत. आम्ही इतर कोणाबरोबर आपापसात बदलीबाबत अर्ज केलेला नाही. झालेली बदली रद्द होणार नाही याची आम्हाला नियम क्र. १४.३ नुसार पूर्ण कल्पना आहे.

| अ. क्र. | विदयार्थ्यांचे नाव व पत्ता | सध्याचे अध्यापक विद्यालय | बदली हवी असलेले अध्यापक विद्यालय |
|---|---|---|---|
| १. | ____________________<br>____________________ | ____________________<br>____________________ | ____________________<br>____________________ |
| २. | ____________________<br>____________________ | ____________________<br>____________________ | ____________________<br>____________________ |

**आपले विश्वासू**

१) नाव : १) सही :

२) नाव : २) सही :

आवश्यक कागदपत्रे : १) उमेदवारांच्या प्रवेशपत्राची छायांकित प्रत
२) विहित रकमेचे दोन डी. डी.

## महाराष्ट्र राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र (प्रवेश नियमावली नियम क्रमांक ९.४)
## भाग – अ
## डोंगरी विभागाचे पूर्ण गट दर्शविणारे तालुके

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुके |
|---|---|---|
| १४ | रायगड | कर्जत, खालापूर, सुधागड, रोहा, माणगाव,<br>महाड, पोलादपूर, पेण, मुरुड, म्हसळा, तळा |
| १५ | ठाणे | शहापूर, मुरबाड, |
| १६ | पालघर | मोरवाडा, वाडा, जव्हार. |
| २१ | पुणे | जुन्नर,आंबेगाव, खेड, मावळ, हवेली, मुळशी, वेल्हे, भोर, पुरंदर. |
| २२ | अहमदनगर | अकोले, संगमनेर |
| ३१ | नाशिक | इगतपुरी, नाशिक, दिंडोरी, पेठ, सुरगणा, कळवण, सटाणा (बागलाण),<br>सटाणा, सिन्नर. |
| ३३ | धुळे | साक्री, शिरपूर |
| ३४ | नंदुरबार | नवापूर, अक्कलकुवा, अक्राणी |
| ४१ | कोल्हापूर | शाहूवाडी, पन्हाळा, करवीर, गगनबावडा, राधानगरी, कागल, भुदरगड<br>आजरा, चंदगड, गडहिंग्लज |
| ४२ | सातारा | सातारा, वाई, पाटण, जावळी, महाबळेश्वर, खटाव, खंडाळा, कोरेगाव |
| ४३ | सांगली | शिराळा |
| ४४ | रत्नागिरी | खेड, चिपळूण, संगमेश्वर, लांजा, राजापूर |
| ४५ | सिंधुदुर्ग | कणकवली, सावंतवाडी, देवगड, कुडाळ, वैभववाडी |
| ५१ | औरंगाबाद | सोयगाव |
| ६३ | नांदेड | किनवट |
| ७१ | अमरावती | धारणी, चिखलदरा |

## भाग – ब
# खालील तालुके डोंगरी विभागाचे अंशतः गट क्षेत्र दर्शविणारे आहेत.

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| १४ | रायगड | पनवेल | १) मणिकघर २) घेडसावना ३) सावना ४) बामणोरी ५) जामदेवा ६) देवलोळी ७) छावना ८) कालेवली ९) सारसाई १०) आपटा ११) कासप १२) कारडा १३) देवटी १४) गुलसुंडा १५) अक्रुब्रडी १६) थुराडाव १७) वावेधर १८) कोष्टी १९) दापोवली २०) सावला २२) करनाहा २३) कला २४) बंडाना २५) कारल २६) दुलघट २७) कासरभाट २८) दिघारी २९) हातवंडी |
| १५ | ठाणे | भिवंडी | १) गणेशपुरी २) वाडवली ३) उसगांव ४) घाडगाव ५) आंबीपाडा ६) गोटाटा ७) मोहिली ८) बाबचा ९) मालवियोर १०) देपोली ११) उसपाडी पाडा १२) अंबराई पाडा १३) थ्यार १४) खडकी खुर्द १५) पिंपळखेर १६) खडकी बुद्रुक १७) भाऊबोळ १८) हुडापाडा १९) कुहा २०) आंबापाडा २१) टेपपाडा २२) माजरापाडा २३) धामणा २४) वारणा पाडा ३०) पाया ३१) खर्डीपाडा ३२) पैरुनपाडा ३३) भावाडीपाडा ३४) खारगाव ३५) गाना ३६) लोकवली ३७) चिंचपाडा ३८) गौरीपाडा ३९) डोकरनापाडा ४०) अलकोअरी |
| १५ | पालघर | वसई | १) चांदज २) तिपलीपा ३) शिवनसा ४) पानसा ५) उसगाव ६) परोळ ७) शिऊणी ८) जळशीया ९) सारवण १०) धाटेघर ११) भावखल १२) पेलाट १३)अजिवली १४) दापेवली १५) कार्जुरा १६) खाडेकर १७) भिडा १८) खोलसट १९) खैरे २०) सुंदरा २१) बुडाल २२) तिल्हेरा २३) सावट २४) मुरतारी २५) बिलबुडा २६) गया २७) दडविरा २८) सातिवली २९) खाडी ३०) दैडा ३१) दडीप ३२) वामन ३३) काजू ३४) कोल्ही ३५)कोळा ३६) चिंचोटी ३७) होवाऊन |
| २२ | सांगली | खानापूर | १) कोतवडे २) सोनतळ ३) सिसरगाव ४) सोनकिरे ५) देविखिंडी ६) रेणावी ७) वासुंबे ८) कुर्ली ९) पारे. |
| २२ | अहमदनगर | पारनेर | १) चिंचोली २) शेरी–कोलदरा ३) दरोडी ४) नांदूपठार ५) सावरगाव ६) कारेगाव ७) चिखोल ८) पाडळी–दर्या ९) जाधववाडी १०) शहजापूर. |
| २२ | अहमदनगर | अहमदनगर | १) आगडगाव २) देवगाव ३) रवडगाव ४) बारदरी ५) मेहकरी ६) माळेवाडी ७) माथणी ८) रांजणी ९) आंडके १०) पिंपळगावकवडा ११) भोयरेखुर्द १२) कोडेगाव १३) सोनेवाडी १४) पिंपळगाव १५) उज्जनी १६) भोयरेपठार. |

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| ३२ | जळगाव | चोपडा | १) मराठा २) सत्रासेन ३) खांडरा ४) भोरचिडा ५) उमरटी ६) गोयापाडा ७) कृष्णापूर ८) खाऱ्यापाडा ९) विजापूर १०) मुव्वावतार ११) शेतपाणी १२) बोरअनंती १३) मालापूर १४) विष्णापूर १५) बोरमळी १६) कर्जाणा १७) मेलाना १८) देव्हार |
| ३२ | जळगाव | यावल | १) मनुबाई देवस्थान २) लंगड्या आंबा ३) गढऱ्या ४) जामन्या ५) उसमळी ६) हरिपुरा ७) नागदेवी ८) वाघश्चीर ९) आसराबारी. |
| ३२ | जळगाव | रावेर | १) तिड्या २) अंधारमळी ३) मोहमोडी ४) चिंचाटी ५) निमड्या ६) गारखेडा ७) मोहमांडली सून ८) पिंपट कुंड ९) प्राल १०) मोरव्ह ११)जिन्ती १२) गारबेडी १३) सहस्त्रलिंग १४) लालमाती. |
| ३२ | जळगाव | एदलाबाद | १) दुई २) सुकली ३) सोमणगाव ४) डोलरखेडा ५) नोंदवेल ६) वायल ७) चारठाणे ८) देवीमंदिर ९) मोरझिरा १०) जोधनखेडा ११) लालगोडा १२) हलखेडा. |
| ३४ | नंदुरबार | शहादा | १) काकरद खुर्द २) काकरदे बुद्रुक ३) कोंढावळ ४) चावसेली ५) चिरडे ६) वरुड बुद्रुक ७) मळगाव ८) भुलाना ९) दरा १०) राणीपूर ११) आकसपूर १२) मानमोड्या १३) नागझरी १४) लगडी भवसनी १५) शहाना १६) खारखेडे १७) आभाणपूर खुर्द १८) नायगाव १९) सिसुरा २०) पेटा २१) कोफाराळे २२) चांदपूर २३) गुदा २४) इकरास २५) काटघर २६) पिरपूर. |
| ३४ | नंदुरबार | तळोदा | १) सोजूरवाडा २) माळखुर्द ३) चोगाव खुर्द ४) लाकुड शेट ५) खर्डी खुर्द ६) काठोर ७) बंधारा ८) खर्डी बुद्रुक ९) जुवाणी १०) लाखापूर ११) माळ १२) मोरा माळ १३) आंबा गव्हाण १४) सीतापावळी १५) वामनी १६) मलुवा १७) राजापूर. |
| ४२ | सातारा | कराड | १) मरळी २) घोरजवाडी ३) कोरीवळे ४) बेलदरे ५) म्होप्रे ६) भोळेवाडी ७) साकुडी ८) येणके ९) कोळे १०) कुसूर ११) तुळसण १२) सवादे १३) वाटकेवाडी १४) हवेलवाडी १५) म्हासोळी १६) शेवाळेवाडी १७) शेळकेवाडी १८) मनू १९) येवती २०) घराळवाडी २१) हणमंतवाडी २२) टाळगाव २३) येळसींव २४) घोरेवाडी २५) गणेशवाडी २६) भरेवाडी २७)साळशिरमे २८) महासगडेवाडी २९) जीती ३०) अक्काईवाडी ३१)कासारशिरमे ३२) निगडी ३३) बोलपवाडी ३४) किवळ ३५) खोडताईवाडी ३६) मसूर ३७) हणबरवाडी ३८) वाण्याचीवाडी ३९) मालवाडी ४०) कांबीरवाडी ४१) शिरगाव ४२) सुळी ४३) पाल ४४) हरफळवाडी ४५) रिसवड ४६) वरतीसाकुडी ४७) सांजूर ४८) तांबवे ४९) आरेवाडी ५०) गमेवाडी ५१) माळवाडी ५२) डोळेवाडी ५३) पांढरवाडी |

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| | | | ५४) आजे ५५) अंबवडे ५६) तारुख ५७) बामनववडी ५८) वानरवाडी ५९) वानवाडी ६०) उंडाळे ६१) भूरभूशी ६२) जखीनवाडी ६३) नांदलापूद६४) वनवासमाची ६५) वसंतगड ६६) घरेगाव ६७) भवानपाडा ६८) शितवाडी ६९) चिरवडी ७०) पाचुद ७१) कामथी ७२) वाघेरी ७३) करवडी ७४) हजारमायी ७५) बावारमाची ७६) वनवासमाची ७७) राजमाची ७८) टेंभू ७९) भयापूर ८०) कोरेगाव ८१) कार्वे ८२) वडगाव हवलेली ८३) शेणोली कालवडे ८४) घोगाव. |
| ४२ | सातारा | फलटण | १) सालपे २) आदकीखुर्द ३) आळजापूर ४) कोराळे ५) वाघोशी ६) लाथवडा ७) माणेवाडी ८) मडकबाईवाडी ९) वेलोशी १०) उपलवे ११) दाववडी १२) मोरेवाडी १३) गिरवी १४) धुमाळवाडी १५) बेडकेवाडी १६) सासकन १७) भाडळी खुर्द १८) दुधेवाडी १९) मीरढे २०) जावली २१) आंदुड २२) कुरवाडी |
| ४२ | सातारा | माण | १) कुळकजाई २) कळसकर वाडी ३) गाडेवाडी ४) शिंदी बुद्रुक ५) पालवण ६) तोंडले ७) उगळेवाडी ८) खंड्याचीवाडी ९) मोगाराळे १०) शिंगणापूर ११) भाडळी १२) इंजलात १३) कळचोड १४) विरळी १५) वळई १६) कुक्कडवाड १७) मखणे १८) काळेवाडी १९) दोरगेवाडी २०) किरकसाड २१) महिमानगड २२) दिवडी २३) पांढरवाडी २४) स्वरूपवानवाडी २५) उकिरडे २६) शिंदी बकुल २७) बोथे |
| ५१ | औरंगाबाद | सिल्लोड | १) धनशिंगवाडी २) बाभुळगाव ३) पोखरी ४) बाबरा ५ मोमीनबाद ६) लेहा ७) बोधेगाव बु. ८) अंधारी ९) जातवा १०) उंमरावती ११) घाटनांदा १२) परदेशीव १३) चारनेर १४) धावडा १५) अंधारवाडी १६) कडेगाव १७) शिरसभ १८) नातेगाव १९) घाटमखळ २०) हलद्ध २१) पिंपळदरी २२) मुखवार २३) वाघरा २४) रांजणी २५) अजिंठा २६) अनाड २७) अमसरी २८) नारवी २९) वडाळी. |
| ५१ | औरंगाबाद | कन्नड | १) तांदुळवाडी २) पेवली ३) मुंगसापूर, ४) पेकडवाडी ५) कोणवाडी ६) कल्याणी ७) वडनेर ८) अंबाला ९) आंबा १०) जामडी ११) रेळ १२) कुंजखेड १३) नांदगिरवाडी १४) हिवरखेडा १५) वडाळी १६) जैतखेडा १७) मालेगाव ठोकळ १८) भारंभा १९) मालेगाव लोखंडे २०) मोहाडी २१) हस्ता २२) माहे २३) देवूपूर २४) पाळशी खु. २५) काळंबी मांजरा २६) भिला २७) गोरपिंपरी २८) सवखेडा बु. २९) पिंपरखेडा ३०) सफीयाबाबत ३१) खडकी ३२) पिंशोर ३३) खातखेडा ३४) वासडी ३५) निंबोरा ३६) उमरखेड ३७) सावरगाव ३८) धामणी ३९) अंबेगाव बु. ४०) मेहुण ४१) हसेवाडी ४२) वडगाव ४३) लोहा |

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| | | | ४४) पागेरी भोपेवाडी ४५) बेलखेल ४६) सोनवाडी ४७) शिवघाट ४८) चिंमणापूर ४९) नागपूर ५०) करंजखेड ५१) रेडळगाव ५२) नेवूपूर ५३) घाटशेदा ५४) टाकळी अतूर ५५) लोहगाव ५६) नायगाव ५७) तपोवन ५८) कान्हेगाव ५९) हिवरा ६०) दुधमाळ ६१) तळनेर ६२) वडोदा ६३) मोहडी ६४) वजीरवाडी. (मोहडी गावाखालील वाडी). |
| ५१ | औरंगाबाद | खुलताबाद | १) वडगाव २) पाडळी ३) शिरोळ ४) सावरखेडा ५) लोणी ६) बोडक ७)खुलताबाद ८) धामणगाव ९) अबदुलापूर १०) निरगुडी बु. ११) पिंपरी १२) जमालवाडी १३) महिसमाळ १४) शिरसमाळ १५) टाकवी खु. १६) आखतवाड १७) वेरळ १८) मंत्रापूर १९) खुलताबाद २०) सराई २१) बादलाबाई २२) नंद्रबाद २३) मापसाळा २४) रसुलपूर २५) शंकरपूरवाडी २६) साबुखेडा २७) शिर्डी २८) सोनखेडा २९) भटजी ३०) लामणगाव ३१) खतेनापूर ३२) वरमगाव. |
| ५३ | अहमद नगर | पाथर्डी | १) चेकेवाडी २) माणिकदौंडी ३) पिरेवाडी ४) बोरसेवाडी ५) आलहणवाडी ६) मोहरी ७) करोडी ८) चिंचपूर-पांगूळ ९) ढाकणवाडी. |
| ५३ | बीड | केज | १) तळनेरी २) नागझरी ३) जिवाचीवाडी ४) घाटेवाडी ५) तुकूचीवाडी ६) कोरड्याचीवाडी ७) गौरवाडी ८) पराचीवाडी. |
| ५३ | बीड | आष्टी | १) देऊळगाव घाट २) चिंचवाडी ३) आरणविहिर ४) कारखेल खुर्द ५) वेलतुरी ६) शेंडाळे ७) मसुबाची वाडी ८) म हिंदा ९) पंग्रा १०) पिंपरी (नजीक घाट) |
| ५३ | बीड | पाटोदा | १) निरगुडी २) वडझरी ३) रोहतवाडी ४) डोमरी. |
| ५३ | बीड | अंबाजोगाई | १) चिंचखंडी २) राक्षसवाडी ३) ममदापूर (परळी) एल्डा ४) मांडवा (पठाण) ५) काळवटी (लमानतांडा) ६) ताकूड ७) अंबलवाडी. |
| ५३ | बीड | बीड | १) हिरवा पहाडी २) बोरखेडी ३) वांगी ४) कोल्हारवाडी ५) अहेरवाडी ६) करझणी ७) धनगरवाडी ८) चराटा ९) मेंगळेवाडी १०) जाधववाडी ११) नागझरी १२) पाटोदा (बेलवंडी) १३) कचारवाडी १४) खंडाळा. |
| ५३ | बीड | परळी (वैजनाथ) | १) सरफराजपूर २) गद्रेवाडी ३) कन्हेवाडी ४) मोहा ५) बोधेगाव ६) सोनहिवरा ७) अस्वलंबा ८) वानटाकळी ९) दोनहपूर डाभो १०) इदबवाडी ११) कन्हेरवाडी १२) भोपला १३) देवाडा. |
| ५३ | बीड | धारूर | १) चिखलबीड २) खडकी ३) टोवाडी ४) पिंपळर ५) मैदवाडी ६) चोरांबा ७) मोहा (जहागीर) ८) काटेवाडी ९) भोगलवाडी १०) मोहखेड ११) आमला १२) कोयाड. |
| ५५ | हिंगोली | हिंगोली | १) नसरी २) लोहगाव ३) सेवली ४) पिंपळा ५) खोरळ ६) जळगाव ७) शेलेगाव ८) सोनेगाव ९) पिंपरखेड १०) देवळा ११) अनपनवडी १२) सुकापूर १३) माथा १४) मूर्तिजापूर १५) केहरपिंपरी १६) सिद्धे |

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| | | | १७) दिधुळ १८) दुडधुना १९) बुडचुना २०) आढी २१) हनुमानदरी २२) शिवकारा २३) जामला २४) जामदन २५) वैजापूर २६) खंबाळा २७) पासेले २८) लवली गव्हाण २९) माडेगाव ३०) राख ३१) जामरी खुर्द ३२) पांगरी ३३) बोराळा ३४) नांदुरा ३५) कडवी ३६) आमनखेड ३७) ब्रह्मपुरी ३८) खळगाव ३९) जामसन ४०) पारडी ४१) खळगाव ४२) रिधोस ४३) सेजगाव ४४) कोळंब ४५) सुकली बु. ४६) सुकशी बु. ४७) शिंदेफळ ४८) धनगरवाडी ४९) सबळखेड ५०) बाभुळगाव ५१) गोरेगाव ५२) पोंडी खु. ५३) ब्राह्मणवाडी ५४) पिंपरी पाथवळ ५५) बोरखेड ५६) एकंबा ५७) खंडाळा ५८) चिंचोळी ५९) बेलुरा ६०) अडगाव ६१) देवठाण ६२)काळेगाव ६३) कलिखेड ६४) कळपकुर्ली ६५) चाटोना ६६) देवठाणे. |
| ५५ | हिंगोली | कळमनुरी | १) खेरडा २) धानापूर ३) धोतरा ४) अमरखोला ५) शिरस खु. ६) शिरस बु. ७) डिग्रस वापी ८) पिंप ९) सांडस १०) रेटकर ११) वराळी १२) खडकत बु. १३) खडकत खु. १४) मंढारी १५) गारखेडा १६) हारी खु. १७) खडकत १८) बैज १९) दुधेरी २०) चिंचोळी २१) खोडतला २२) पेडगाव २३) डोंगी २४) नांदुरा २५) बोलाववाडी २६) तळेगाव २७) जाबा २८) निमसे बु. २९) काप ३०) शिपगी ३१) माळवाडी ३२) दांडेगाव ३३) मोपीचौर ३४) विठ्ठलवाडी ३५) पिंपरी खु. ३६) कान्हेगाव ३७) फाटाणा ३८) दाभाडी ३९) पुंधरा ४०) मारेगाव. |
| ७२ | बुलढाणा | खामगाव | १) गिरोळी २) इसालवाडी ३) चिचखेडनाथ ४) कड्वेगाव ५) चिचखेडबंड ६) शेंद्री ७) मांडणी ८) बोथा ९) खेर्डी १०) बाकी ११) गारवेड १२) गारोडी १३) थार १४) माटरगाव १५) चिंचखेड १६) सारोळा १७) कोन्टी १८) बझर १९) पिंपरीधनगर २०) लाखनवाडी खुर्द २१) फत्तेपूर २२) निमखेड २३) लाखनवाडी बु. २४) हिवरखेड २५) निरोडा |
| ७३ | अकोला | पातूर | १) अंबारी २) भानोसा ३) बेलतळ ४) मलकापूर ५) मोफदकंद्रोली ६) बडीआमरई ७) बोडसा ८) खानापूर ९) काकडदरी १०) कोठारी बु. ११) पासटल १२) कोसगाव १३) माळाराजुरा १४) सावरखेड १५) चिंचखेड पातूर १६) शेकापूर १७) कार्ला १८) चारमुळी १९) धरम २०) पांदुर्णा २१) सोनुना २२) चिखलवाव्हळ २३) चौडी २४) जांब २५) चिंचखेड २६) गोळेगाव २७) आधारसावंगी २८) गावटगाव २९) सावरगाव. |
| ७५ | यवतमाळ | पुसद | १) पिंपळगाव २) हौसापूर ३) बामनवाडी ४) कान्होळ ५) गहुळी ६) चौडी ७) चिंचघाट ८) देवगव्हाण ९) बेलगव्हाण १०) जामनीधुंदी ११) मोरगड १२) उडवी १३) पारवा १४) पादुर्णी (खु.) १५) खटकोला १६) पन्हाळा १७) मांजरजवळा खुर्द १८) मांजरजवळा बुद्रुक १९) सावतमाळ २०) हणमंतखेड २१) मारवाडी २२) अमृतनगर २३) धनसळ २४) अनसळ |

| जिल्हा संकेतांक | जिल्हा | तालुका | डोंगरी गावांची यादी |
|---|---|---|---|
| | | | २५) उपवनवाडी २६) रामपूरनगर २७) दूधगिरी २८) अनसिंग २९) जांबनाईकर ३०) शिलोना. |
| ७५ | यवतमाळ | उमरखेड | १) उडाळा २) पार्डी ३) पिरंजी ४) गोविंदपूर ५) कुरळी ६) जाम ७) अकोली ८) साताळा ९) मसगळ १०) पार्डी ११) जेवळी १२) पिंपळगाव १३) खोडवा १४) पेंधा १५) उदापूर १६) सावरगाव १७) परोटी खुर्द १८) नानी १९) बोरी २०) थेरडी २१) पवनाळा २२) सोनदाभी २३) थेकंबा २४) मोरचंडी २५) कोसंबी २६) चिखली २७) रामपूर २८) बोरगाव २९) डोंगरगाव ३०) घडोली ३१) सोईर ३२) नवेलालपूर ३३) दिग्रस ३४) काटी ३५) कवठा ३६) दहेली ३७) धानोरा ३८) शिवाजीनगर ३९) जवराळा ४०) उमरी ४१) असोली ४२) सेवालालनगर ४३) वडगाव ४४) दामतरी ४५) थार बु. ४६) सेरंडी ४७) दरारी ४८) मथुरानगर. |
| ९१ | रत्नागिरी | मंडणगड | १) अंबावनाबुद्रुक २) किंजालघर ३) लोरी ४) हेल्ट ५) भारीपाडा ६) पेवा ७) पडिरी ८) पाडवा ९) उंबर सेंट १०) टी व्हेसाई ११) टेरी १२) कोकरवन १३) महाप्रत १४) हडघर १५) तांभी १६) लोहरा १७) गोरज १८) कुंभार १९) गोवेळे २०) पन्हाली २१) धुरी २२) तारवली २३) आंबेगण २४) धनगर २५) सारळा २६) अडखल २७) व्हेसाई २८) पाट २९) शेजाला ३०) सोईलीतर्फे व्हेसाई ३१) कुडूक खुर्द ३२) शिरगाव ३३) धोतरोली ३४) साडा ३५) तळेघर ३६) टाकेडी ३७) पाचरोल ३८) धामणी ३९) बोरखट ४०) गोठा ४१) धमणघर ४२) सानोटी ४३) निगडी. |
| ९२ | सिंधुदुर्ग | मालवण | १) कुलोस २) असरुंडी ३) भवानी ४) वंजकार ५) टाटारभाव ६) भाटपावणी ७) भिरवडे ८) राटीवडे ९) आजगणी १०) ब्राम्हण ११) हिवाळे १२) ओवलीथे १३) खोटले १४) हेडूल १५) वायंमगावडे १६) वायरन १७) पोईप १८) नेसुरे १९) वाडेच्या पाट २०) नवापाट २१) गोलवण २२) डिकवळ २३) चापेखोल २४) कुमामे २५) नांदोस २६) तिरावडे २७) पारस २८) हेडूल. |

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ (शासकीय कोटा)

**१) ऑनलाईन प्रवेशासंबंधी सर्वसाधारण नियम :**

उमेदवाराने नियमावलीतील नियम क्र. १८ नुसार आवश्यक त्या प्रमाणपत्राची पूर्तता करावी. प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास राखीव संवर्गातील उमेदवारांना खुल्या संवर्गातील उमेदवार मानण्यात येईल. त्यानुसार पात्रता, गुणवत्ता व शुल्काबाबत कार्यवाही करण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकानुसार तसेच वेळोवेळी संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचनांनुसार उमेदवाराने कार्यवाही करणे ही उमेदवाराची जबाबदारी राहील.

१.१) प्रवेश प्रक्रिया : प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन (संगणकाच्या साहाय्याने) व गुणवत्तेनुसार सरळ प्रवेश पद्धतीने होईल.

१.२) संगणकाच्या साहाय्याने सरळ प्रवेश प्रक्रिया : या पद्धतीत गुणवत्तेनुसार ऑनलाईन (संगणकामार्फत) माध्यमनिहाय, शाखानिहाय, संवर्गनिहाय प्रवेश करण्यात येतील. या प्रवेशासाठी समुपदेशनास बोलावले जाणार नाही. प्रवेशासंबंधीची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असेल. प्रवेश अर्जावर **स्वतःचा संपर्क पत्ता** (Email ID)/भ्रमणध्वनी क्रमांक योग्यप्रकारे अचूक नोंदविणे आवश्यक आहे.

**२) प्रवेश प्रक्रियेचे टप्पे :**

**ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया :**

२.१) डी.एल.एड. प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ साठी प्रवेश नियमावलीतील www.maa.ac.in या संकेतस्थळावर जावे.

२.२) प्रवेश प्रक्रियेची नोंदणी (D.El.Ed.) या बटणावर क्लिक करावे.

२.३) D.El.Ed. प्रवेशासाठी येथे क्लिक करा.

२.४) Menu bar वरील Important information मध्ये **प्रवेश नियमावली** काळजीपूर्वक वाचावी.

२.५) तसेच **प्रवेशाबाबतचे वेळापत्रक, फी** Home page वरील प्रवेशाचे टप्पे दर्शविणारा Flow Chart पहा.

२.६) आवश्यक असणारी व विचारण्यात आलेली माहिती ऑनलाईन नोंदणी फॉर्ममध्ये भरावी.

**३) ऑनलाईन अर्ज प्रक्रिया व प्रवेश शुल्क भरणे :**

३.१) आवश्यक ती माहिती भरल्यानंतर सिस्टिम लॉगिन आयडी दर्शवेल. आपल्याला लॉगिन आयडी आणि पासवर्ड एसएमएसद्वारे व Email वर मिळेल. (कृपया त्यासाठी आपला अचूक मोबाईल नंबर द्या.) आपला **Email ID** व **Password** प्रवेश प्रक्रिया संपेपर्यंत जपून ठेवावा.

३.२) वेबसाईटवर लॉगिन करून **Fill Application form** आवेदन पत्र भरण्यासाठी फॉर्म या लिंकवर क्लिक करा.

३.३) अर्जामध्ये खालील माहिती भरणे आवश्यक आहे :

१) व्यक्तिगत माहिती, २) संपर्काबद्दल माहिती, ३) आरक्षणांबाबत माहिती, ४) फोटो आणि सहीची स्कॅन कॉपी अपलोड करणे, ५) शैक्षणिक अर्हता, ६) इतर आवश्यक माहिती.

३.४) वर दिलेली सर्व माहिती पुरविल्याशिवाय अर्जाची पूर्तता होणार नाही.

३.५) पूर्ण आवेदन पत्र भरल्यानंतर आवेदन पत्र भरल्याबद्दलची खात्री करा.

३.६) उमेदवार नेटबँकिंग/क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड या माध्यमांमार्फतही ऑनलाईन शुल्क भरू शकतात. एकदा ऑनलाईन शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्यांस फॉर्ममध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

३.७) जर आपण क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड या माध्यमातून ऑनलाईन शुल्क भरल्यानंतर उमेदवाराची अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

३.८) वेबसाईटवर प्रवेश शुल्क भरण्याची माहिती आपल्या आयडी आणि पासवर्डचा उपयोग करून पाहू शकता प्रवेश शुल्क प्राप्त झाल्यानंतर आपणास एसएमएसद्वारादेखील माहिती मिळू शकेल.

**४) विद्यार्थ्यांनी घ्यावयाची दक्षता** :

४.१) मा. संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे किंवा ''राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती'' किंवा प्रवेश प्रक्रिया पार पाडणाऱ्या एजन्सीकडे आवेदन पत्राची प्रिंटआऊट पाठविण्याची आवश्यकता नाही.

४.२) प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या माहितीसाठी www.maa.ac.in ही वेबसाईट नियमित पहावी. यासाठी उमेदवाराने स्वतःचा मोबाईल नंबर व ईमेल-आयडी टाकावा.

४.३) **अपूर्ण व चुकीची माहिती** भरलेल्या प्रवेश अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४.४) पडताळणी अधिकाऱ्यांनी **Online Approve** केल्याशिवाय उमेदवाराचा प्रक्रियेमध्ये समावेश होणार नाही याची नोंद घ्यावी.

४.५) संकेतस्थळावरील **नियमावलीचे** काळजीपूर्वक वाचन करावे.

उमेदवारांनी ऑनलाईन अध्यापक विद्यालयाचा प्राधान्यक्रम अर्ज तसेच शैक्षणिक अर्हता गुण भरावेत.

**५) गुणवत्ता यादीतील क्रम ठरविण्याची पद्धती** :

उमेदवारांच्या गुणवत्ता यादीसाठी गुणवत्ता क्रम ठरविण्यासाठी उमेदवाराने इयत्ता १२ वी मध्ये मिळविलेल्या गुणांचा विचार पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

५.१) सर्व प्रवेश पात्र अर्जांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी, ७० टक्के व ३० टक्केसाठी माध्यमनिहाय, शाखानिहाय, संवर्गनिहाय तसेच सामाजिक आरक्षणानुसार गुणवत्ता याद्या (नियम ९ नुसार) तयार करण्यात येतील. गुणवत्ता यादीतील माहिती आपणास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे वेबसाईटवर उपलब्ध होऊ शकेल.

५.२) प्रवेश नियमावलीतील नियम क्र. ६ नुसार इ. १२ वी चे प्राप्त गुण

५.३) प्रवेश नियमावलीतील नियम क्र. (७.१ ते ७.३) नुसार उमेदवारास प्राप्त गुण.

५.४) उमेदवाराने वरील ५.१ व ५.२ मध्ये प्राप्त केलेल्या गुणांची बेरीज करून येणाऱ्या गुणांनुसार उमेदवाराचा गुणवत्ताक्रम ठरविला जाईल.

५.५) इ. १२ वीचे अंतिम गुण व अधिकचे गुण (नियम क्र. ७) यांचे एकत्रित गुण लक्षात घेऊन गुणवत्ताक्रम निश्चित होईल. दोन उमेदवारांचे गुण समान असल्यास इ. १० वी चे गुणावरून गुणवत्ताक्रम निश्चित होईल. इ. १० वी चे गुण समान असल्यास वयाने मोठ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

**६) अध्यापक विद्यालयाचा प्राधान्यक्रम भरण्याची पद्धती** :

६.१) उमेदवाराला माध्यमनिहाय प्राधान्यक्रम अर्ज भरता येईल.

६.२) उमेदवाराला एकावेळी **किमान ३ व जास्तीत जास्त ५ अध्यापक विद्यालयांचा प्राधान्यक्रम** देता येईल.

६.३) हा अर्ज भरत असताना ज्या अध्यापक विद्यालयात उमेदवाराला प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रम भरावेत.

६.४) **अध्यापक विद्यालयाचा आलेला प्राधान्यक्रम व गुणवत्ता यावर प्रवेश आधारित असल्यामुळे अध्यापक विद्यालयांचा प्राधान्यक्रम अतिशय काळजीपूर्वक भरावा.**

६.५) अध्यापक विद्यालयाचा प्राधान्यक्रम प्रवेशासाठी महत्त्वाचा असल्याने उमेदवाराने पात्र शाखा व माध्यमासाठी उपलब्ध असणाऱ्या **किमान ३ आणि जास्तीत जास्त ५ अध्यापक** विद्यालयासाठी योग्य प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे. एखाद्या माध्यमाची ३ अध्यापक विद्यालये नसल्यास उपलब्ध असलेल्या (१ किंवा २) अध्यापक विद्यालयाचे प्राधान्यक्रम द्यावेत.

६.६) प्रत्येक माध्यमासाठी स्वतंत्र अर्ज भरावा.

६.७) ज्या अनुदानित अध्यापक विद्यालयाशी संलग्न विनाअनुदानित तुकडी असेल अशा अध्यापक विद्यालयामध्ये प्रथमतः अनुदानित असलेल्या तुकडीतील प्रवेश पूर्ण क्षमतेने केले जातील. अनुदानित तुकडीतील जागा रिक्त असून त्याच अध्यापक विद्यालयाच्या विना अनुदानित तुकडीत प्रवेश गुणवत्तेनुसार व प्राधान्यक्रमानुसार झाल्यास असे सर्व प्रवेश त्यांचे अनुदानित तुकडीमध्ये वर्ग करण्यात येतील. याप्रमाणे केलेली कार्यवाही अंतिम राहील.

**७) प्रवेश फेऱ्या** :

७.१) प्रवेशासाठी खालीलप्रमाणे ऑनलाईन तीन फेऱ्या घेण्यात येतील.

**प्रथम फेरी** : शासकीय/अनुदानित/केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालये.

प्रत्येक फेरीनंतर जागा शिल्लक असल्यास व अर्ज केलेले उमेदवार शिललक राहिल्यास त्या जागा भरणेबाबतचा निर्णय राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय, संनियंत्रण समिती, पुणे यांचा राहील.

**दुसरी फेरी** : शासकीय/अनुदानित/केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत सहभागी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित अध्यापक विद्यालये.

७.२) आवश्यकतेनुसार फेरी कमी जास्त करण्याचे किंवा प्रवेश प्रक्रियेच्या स्वरूपात बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय, संनियंत्रण समिती, पुणे यांच्याकडे राहतील.

**८) प्रवेशाचे वेळापत्रक** :

८.१) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या अध्यापक विद्यालयांची यादी ऑनलाईन प्राधान्यक्रम भरताना उपलब्ध आहे. त्यात काही बदल झाल्यास ते वेळोवेळी ऑनलाईन दर्शविण्यात येईल.

८.२) माहिती पुस्तिकेत देण्यात आलेले वेळापत्रक संभाव्य आहे.

८.३) त्यात बदल झाल्यास तो वेळोवेळी www.maa.ac.in या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.

८.४) प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्या व वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार **''अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड, निर्णय, संनियंत्रण समिती, पुणे''** यांच्याकडे राहतील.

८.५) अपूर्ण व चुकीची माहिती भरण्यात आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८.६) संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राहील.

**९) तात्पुरता प्रवेश :**

९.१) उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या गुणवत्तेनुसार व त्याने दिलेल्या अध्यापक विद्यालयाच्या प्राधान्यक्रमानुसार माध्यमनिहाय, शाखानिहाय व संवर्गनिहाय उपलब्ध जागेवर केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारा तात्पुरता प्रवेश दिला जाईल. वेळापत्रकानुसार तात्पुरत्या प्रवेशित उमेदवारांची यादी वेबसाईटला प्रसिद्ध केली जाईल. ज्या उमेदवारांना तात्पुरता प्रवेश मिळाला आहे. अशा उमेदवारांनी ऑनलाईन तात्पुरते प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे.

९.२) तात्पुरत्या प्रवेशित उमेदवारांने संबंधित अध्यापक विद्यालयात वेळापत्रकानुसार तात्पुरते प्रवेशपत्र व सर्व मूळ प्रमाणपत्रासह उपस्थित राहावे. तात्पुरत्या प्रवेशित उमदेवाराचा प्रवेश, उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे देण्यात येतो. अध्यापक विद्यालयामार्फत उमेदवाराने सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे त्याची प्रवेश पात्रता/गुणवत्ता/संवर्ग/माध्यम पात्रता याची तपासणी संबंधित अध्यापक विद्यालय प्राचार्यांमार्फत केली जाईल. **मात्र त्यात काही त्रुटी आढळल्यास अध्यापक विद्यालयामार्फत प्रवेश रद्द केला जाईल. सर्व प्रमाणपत्रांची छाननी करून प्रवेश अंतिम करण्याची जबाबदारी सर्वस्वी अध्यापक विद्यालयांच्या प्राचार्यांची राहील.** तपासणीअंती पात्र उमेदवाराचा प्रवेश उमेदवाराने संबंधित अध्यापक विद्यालयाचे विहित मान्य शुल्क भरल्यानंतर अंतिम केला जाईल. **उमेदवाराच्या प्रवेशानंतर काही अपात्रता निदर्शनास आल्यास त्यास संबधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील.**

९.३) केंद्रीय डी.एल.एड. प्रवेशाचे वेळापत्रक वेबसाईटवर देण्यात येईल. वेळापत्रकात काही बदल असल्यास तो वेळोवेळी संकेतस्थळावर जाहीर केला जाईल.

९.४) प्रवेशित उमेदवार संबंधित अध्यापक विद्यालयात **चार दिवसात उपस्थित न झाल्यास दिलेला तात्पुरता प्रवेश आपोआप रद्द होईल** व सदर प्रवेशावर विद्यार्थ्यांचा कोणताही अधिकार असणार नाही.

**१०) अध्यापक विद्यालयात प्रवेश घेताना संबंधित विद्यार्थी व अध्यापक विद्यालय यांनी घ्यावयाची दक्षता :**

१०.१) प्रवेश मिळाल्यानंतर अध्यापक विद्यालयात सर्व प्रमाणपत्राची छाननी होते व त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास प्राचार्यामार्फत प्रवेश रद्द केला जाईल. त्यामुळे उमेदवाराने प्रवेश अर्जात योग्य व सत्य माहिती भरणे ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी असून चुकीची माहिती भरल्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास त्यासाठी संबंधित उमेदवारच जबाबदार राहील.

१०.२) प्रवेशपात्र उमेदवाराचा प्रवेश अध्यापक विद्यालयाने स्वतःच्या Login मधून Online पद्धतीनेच कायम होईल.

**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय डी.एल.एड. प्रवेश निवड,**
**निर्णय, संनियंत्रण समिती**
**तथा**
**संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण**
**परिषद, महाराष्ट्र, पुणे.**